रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १५३ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## एनडीएच्या प्रमुखपदी अनिल जग्गी



**पुणे** : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे (एनडीए) प्रमुख म्हणून व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मावळते प्रमुख व्हाइस ॲडमिरल गुरचरण सिंग यांच्याकडून जग्गी यांनी नियुक्ती स्वीकारली. भारतीय नौदल अकादमीचे (आयएनए) माजी विद्यार्थी असलेले ॲडमिरल अनिल जग्गी १ जानेवारी १९९३ रोजी भारतीय नौदलात रुजू झाले. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी विविध कार्यालयीन जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांनी क्षेपणास्त्र जहाज आयएनएस वीर, स्वदेशी शिवालिक श्रेणीतील स्टेल्थ गाईडेड मिसाइल फ्रिगेट आयएनएस सह्याद्रीचे नेतृत्व केले आहे.




## वेधक

### १८ वर्षीय तरुणी बेपत्ता

**पनवेल :** १८ वर्षीय प्रांजल मच्छिंद्र रायकर (रा. ओम न्यू रेसिडेन्सी, टेंभोडे, पनवेल) ही तरुणी हरवल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिची उंची पाच फूट, सहा इंच, चेहरा उभट, डोळे काळे आहेत. डोक्याचे केस काळे आणि लांब असून, ती अंगाने सडपातळ आहे. तिचा रंग सावळा असून, पायात काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट आणि अंगात पांढऱ्या रंगाची टी-शर्ट परिधान केले आहे. तिच्या उजव्या हाताच्या दंडावर भावाचा फोटो गोंदलेला आहे. या मुलीबाबत अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार शिवानंद पुजारी यांच्याशी संपर्क साधावा.

### शेतकऱ्याला मारहाण

**रसायनी :** सवणे येथे शेतात गायी शिरल्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका शेतकऱ्याला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सत्यवान गोपाळ देशमुख (रा. सवणे, आपट्याचा दांड) हे आपल्या शेतात भात झोडणी करत असताना, त्यांचे मावस भाऊ सुरेश रघुनाथ देशमुख (रा. सवणे) यांच्या तीन गायी तीन ते चार वेळा सत्यवान देशमुख यांच्या शेतात शिरल्या. याबाबत सत्यवान देशमुख यांनी सुरेश देशमुख यांना सांगितले. याचा राग मनात धरून सुरेश देशमुख यांनी सत्यवान देशमुख यांना लाकडी काठीने पाठीवर, हातापायांवर मारहाण केली. त्यांना जमिनीवर पाडून त्यांच्या अंगावर बसून हाता-बुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करत दमदाटी केली. या घटनेनंतर सत्यवान देशमुख यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, सुरेश देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आमचं ठरलं... अक्षया नाईक नगराध्यक्षपदाच्या उमेदवार



## महाविकास आघाडीमध्ये युवा नेतृत्वाला संधी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. शेकापसह महाविकास आघाडी ही निवडणूक एकत्र लढविणार आहेत. त्यानिमित्ताने रविवारी शेकाप भवनमध्ये बैठक झाली. या बैठकीत महाविकास आघाडीकडून नगराध्यक्ष पदासाठी शेकापच्या अक्षया नाईक, वॉर्ड क्रमांक पाचमध्ये नगरसेवक पदासाठी काँग्रेसचे समीर ठाकूर, वॉर्ड क्रमांक सातमध्ये नगरसेवक पदासाठी अभय म्हामूणकर यांची उमेदवारी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी जाहीर केली.

यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, काँग्रेसचे जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर, योगेश मगर, प्रभाकर राणे, ॲड. उमेश ठाकूर,


समीर ठाकूर


अभय म्हामुणकर

शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, जगदीश कवळे, विजय भगत, पांडुरंग भगत, सुकुमार भगत, ॲड. सचिन जोशी, संजना कीर, अश्विनी पाटील, महेश शिंदे, राकेश चौलकर आदी मान्यवरांसह शेकापसह काँग्रेस, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्षया नाईक यांची नगराध्यक्ष पदासाठी, तर नगरसेवक पदासाठी समीर ठाकूर, अभय म्हामुणकर यांची उमेदवारी जाहीर करताच कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. विशेष म्हणजे, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांची कन्या अक्षया नाईक यांचे सामाजिक क्षेत्रात योगदान राहिले आहे. त्यांची नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी जाहीर होताच, कार्यकर्त्यांकडून टाळ्यांच्या कडकडाटासह फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. महाविकास आघाडीचा विजय असो अशा घोषणांनी सभागृह दणाणून सोडला. यावेळी अक्षया नाईक यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे •➤पान २ वर

# एकदिलाने काम करा

## जयंत पाटील यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत ५० टक्के तरुणांना संधी दिली जाणार आहे. शेकापसह महाविकास आघाडीचे काँग्रेस व शिवसेना पक्षदेखील मन लावून या निवडणुकीत उतरले आहेत. हा एक विजयाचा मार्ग आहे. एक वेगळ्या वातावरणात ही निवडणूक होणार आहे. अलिबाग शहराच्या विकासाला प्रशांत नाईक यांच्याशिवाय पर्याय नाही. प्रत्येक कार्यकर्त्याने एकदिलाने काम करून आपले उमेदवार निवडून आणण्यासाठी मेहनत घ्यायची आहे, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.



● (छायाचित्र : समीर मालोदे)

अलिबाग नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकापसह महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक शेकाप भवन येथे रविवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी झाली. या बैठकीत जयंत पाटील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी जयंत पाटील म्हणाले की, महाराष्ट्रात नगरपरिषदांच्या निवडणुका वेगळ्या वातावरणात होत आहेत. शेकापसह महाविकास आघाडीच्या माध्यमातून ही निवडणूक लढविली जाणार आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचे पक्ष एकत्र येऊन राज्यभर निवडणूक लढवित आहोत. त्यामुळे या निवडणुकीत प्रत्येकाने एकोप्याने काम करणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या बैठकांच्या माध्यमातून राज्यस्तरावर याबाबत निर्णय झाला आहे. •➤पान २ वर

# स्कूलबसला भीषण अपघात



■ एकाचा मृत्यू
■ १५ विद्यार्थी गंभीर जखमी

**। नंदुरबार । प्रतिनिधी ।**

अक्कलकुवा तालुक्यातील अमलीबारीजवळ रविवारी (दि. ९) दुपारी शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या एका स्कूल बसला भीषण अपघात झाला. मोलगी-अक्कलकुवा रस्त्यावरील अमलीबारी येथील एका धोकादायक वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस १०० ते १५० फूट खोल दरीत कोसळली. या दुर्दैवी घटनेत एका विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला असून, १० ते १५ विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत.

जळगाव जिल्ह्यातील मेहुनबारी आश्रम शाळेचे हे विद्यार्थी होते. दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यामुळे विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत घेऊन जाण्यासाठी ही बस आली होती. बसमध्ये अंदाजे २० ते ३० विद्यार्थी भरलेले असताना दुपारी मोलगी-अक्कलकुवा रस्त्यावर हा अपघात झाला. बस दरीत कोसळल्यानंतर मोठा आवाज होताच परिसरातील ग्रामस्थ आणि स्थानिक प्रशासन घटनास्थळी धावून •➤पान २ वर

# भिवगडाचा कडा कोसळला

## परिसरात भीतीचे वातावरण

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील गौरकामत परिसरातील प्रसिद्ध भिवगड किल्ल्याच्या डोंगराचा भाग अचानक कोसळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पश्चिमेकडील मुख्य कड्यावरून सुमारे पंधरा ते वीस फुटांचा भाग खाली कोसळला असून, या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी डोंगररचनेची घसरण सुरू असल्याने घटना गंभीर मानली जाते.



भिवगड किल्ला हा शिवकालीन इतिहासाचा महत्त्वाचा वारसा मानला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्याचा वापर होत असल्याचे अनेक ऐतिहासिक नोंदींमध्ये आढळते. किल्ल्यावरील तटबंदीचे अवशेष व प्राचीन बांधकाम आजही दृश्य स्वरूपात असून, इतिहासप्रेमींसाठी हा किल्ला आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. सध्या या किल्ल्याभोवतालच्या बऱ्याच भागात लोकवस्ती नसली तरी किल्ल्याच्या उत्तर बाजूस आदिवासी वाडी असल्यामुळे या वस्तीला धोका •➤पान २ वर

## दहशतवाद्यांना अटक

**नवी दिल्ली :** गुजरात दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) अहमदाबाद येथील अडालज येथून दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या तीन जणांना अटक केली आहे. एटीएस पथक गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर लक्ष ठेवून होते. एका गुप्त माहितीनंतर, एटीएसने रविवारी (दि. ९) सकाळी तिघांना अटक केली. तपासात तिघेही आयसिससाठी काम करत असल्याचे समोर आलं आहे. एटीएसला माहिती मिळाली की दहशतवादी शस्त्रे गोळा करण्यासाठी गुजरातमध्ये येत आहेत आणि •➤पान २ वर

# काशीद समुद्रात दोघे बुडाले

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

अकोला येथील एका शिक्षकासह विद्यार्थ्याला सहलीला येणे जीवावर बेतले आहे. काशीद समुद्र किनारी अकोला शहरातील एका खासगी शिकवणी वर्गातील शिक्षक व विद्यार्थी सहलीसाठी आले होते. त्यावेळी समुद्रात बुडून दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. राम कुटे आणि आयुष रामटेके असे बुडून मृत्यू झालेल्या दोन जणांची नावे आहेत.

तालक्यातील काशिद समुद्र किनाऱ्यावर अकोला येथून विद्यार्थी सहलीसाठी आले होते. काशीद किनाऱ्यावर पोहोचल्यावर काही मुले समुद्रात पोहण्यासाठी उतरली. पाण्याचा अंदाज न आल्याने पोहता पोहता तिघे पाण्यात डुबक्या खाऊ लागले. त्यापैकी एक विद्यार्थी आणि एका शिक्षकाचा मृत्यू झाला असून, एक विद्यार्थी सुखरूप आहे. राम कुटे (६०, रा. अकोला, शिक्षक), आयुष रामटेके (१९, रा. अकोला, विद्यार्थी) यांचा मृत्यू झाला. तिसरा बुडालेला आयुष बोबडे (१७, रा. अकोला) हा विद्यार्थी सुखरूप आहे. आयुषवर सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचा मुरुड पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## प्रचाराच्या तोफा थंडावल्या

**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. दुसऱ्या टप्पयासाठी रविवारी संध्याकाळी ६ वाजता निवडणूक प्रचार थांबला. बिहार निवडणुकीच्या या दुसऱ्या टप्प्यात ११ नोव्हेंबर रोजी २० जिल्ह्यांमधील १२२ विधानसभा जागांवर मतदान होणार आहे. यामध्ये १०१ सर्वसाधारण, १९ अनुसूचित जाती आणि २ अनुसूचित जमाती राखीव जागा आहेत. एकूण ३ कोटी ७० लाख १३ हजार ५५६ मतदार आपला •➤पान २ वर

# विशाल शिंपीला दहा दिवसांची पोलीस कोठडी

## प्रसन्न पुलेकर प्रकरणात सहभागी असल्याने पोलिसांकडून अटक

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड शहर व ग्रामीण भागातील जनतेस कमीत कमी एक लाख रुपये गुंतवल्यास प्रत्येक महिन्यास दहा हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची गुणवणूक करणारा व तद्नंतर पैसे देण्यास नकार देणारा प्रसन्न पुलेकर यास मुरुड पोलिसांनी काही दिवसांपूर्वी अटक केली होती. याप्रकरणी चौकशीदरम्यान विशाल शिंपीला प्रसन्न पुलेकर प्रकरणात सहभाग असल्याने अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, जुलै महिन्यापासून अटक असणाऱ्या प्रसन्न पुलेकराला न्यायायल्याने जमीन मंजूर न केल्याने अलिबाग येथील जेल मध्ये खितपत पडला आहे. सदरचे प्रकरण हे कोट्यवधी रुपयांचे असल्याने मुरुड पोलीस याचा •➤पान २ वर

# राज्यात थंडी हुडहुडी भरवणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

यंदा पावसाने अगदी ऑक्टोबरच्या शेवटापर्यंत हजेरी लावलेली असताना आता महाराष्ट्रामध्ये थंडीची चाहूल लागली आहे. थंडी हळूहळू महाराष्ट्रात दाखल होत असून, पुढील काही दिवसांत राज्यात गारठ्याचे साम्राज्य पसरणार आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस तापमानात चढ-उतार होणार आहेत. म्हणजे, सकाळ-संध्याकाळ थंडी आणि दुपारी थोडी उबदार हवा, असे हवामान अनुभवता येणार आहे.



हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यात सध्या कोरड्या हवेचा प्रभाव असून, त्यामुळे आकाश मुख्यत: स्वच्छ राहील. पण सकाळ-संध्याकाळ थंडी वाढेल. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या भागात किमान तापमान १२ ते १५ डिग्री सेल्सिअसपर्यंत खाली जाणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर या शहरांमध्ये सकाळी लवकर गार वारा जाणवेल, तर कोकणात मात्र तापमान थोडं वाढतं राहील. एकूणच, महाराष्ट्रात थंडीची खरी सुरुवात झाली असून, दिवसभर ऊन असलं तरी रात्रीच्या वेळी गारठा अंगावर येतोय. पुढील काही दिवसांत ही थंडी आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे आता गरम कपडे, ब्लँकेट आणि गरम पेयांचा मोसम सुरू झाला आहे, असं म्हणायला हरकत नाही.



# आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली नगरपालिकेच्या १५ प्रभागांमधील ३१ जागांसाठी निवडणुकीची सोमवारपासून रणधुमाळी सुरू होत आहे. दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळी १० पासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होत आहे. १७ नोव्हेंबर दुपारपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहे. नगरपालिकेच्या चौथ्या मजल्यावर निवडणूक अधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज विक्री, स्वीकारण्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे.

उमेदवारी अर्ज भरताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात उमेदवार आणि त्यांच्यासोबत सूचक आणि एक व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे. याखेरीज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयापासून शंभर मीटर आवारात अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच या परिसरात उमेदवारांसोबत जास्तीत जास्त तीन वाहनांना प्रवेश दिला जाणार नसल्याची माहिती मिळाली आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत एकत्र लढणारी अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शिंदेच्या शिवसेना यांच्या विधानसभेच्या निवडणूपासून सुरू असलेला संघर्षमय वाद संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यामुळे दोन्हीही पक्ष आमनेसामने लढणार असल्याचे चिन्ह असले तरी उध्दव ठाकरे यांच्यापक्षाने अजितदादांच्या राष्ट्रवादीशी जुळते घेण्याचे संकेत दिल्याने नेमक्या काय वाटाघाटी सुरू आहेत अशी चर्चा असून, भाजप काय निर्णय घेणार यावर महायुतीतील पक्षाचे भविष्य अवलंबून आहे.



# विद्यार्थ्यांची पत्रावळ कार्यशाळा

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील राजिप सिद्धेश्वर शाळेतील विद्यार्थ्यांना पत्रावळ तयार करण्याचे प्रात्यक्षिक शनिवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी घेण्यात आले.

पत्रावळ बनविण्यासाठी पळसाची पाने, बांबूच्या काड्या, चाकू या साहित्याचा वापर केला. उपक्रमशील शिक्षक जनार्दन भिलारे यांनी प्रात्यक्षिक करून पत्रावळी कशी तयार केली जाते ते करून दाखविले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पळसाची पाने वेगळी करून मधल्या पानाच्या मागे दुसरे पान उलटे लावून घेतले यानंतर दुसरी चार पाने चारी बाजूला बांबू काडीने टाचून घेतली. अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक सुंदर पत्रावळ तयार केली.

विविध प्रकारच्या कार्यक्रमात जेवण करण्यासाठी पत्रावळीचा उपयोग केला जातो.अशा प्रकारच्या पत्रावळ वापरल्याने प्रदूषण होत नाही, त्या जमिनीत कुजल्याने उत्कृष्ट सेंद्रिय खत तयार करता येते. बाजारात मिळणाऱ्या पत्रावळीपेक्षा टिकाऊ असतात, ह्या पत्रावळीवर जेवताना खूप आनंद होतो. ही कला शिकल्याने विद्यार्थी स्वतः पत्रावळ तयार करून रोजगार मिळू शकतो. परिसरात पळसाची पाने सहज उपलब्ध होतात. ग्रामीण भागात पूर्वी विविध प्रकारच्या कार्यक्रमात लोक एकत्र येऊन पत्रावळ तयार करून त्याचा वापर करत असत; परंतु काळाच्या ओघात ही कला आज लोप पावत चालली आहे. विद्यार्थांना याचे प्रात्यक्षिक जनार्दन भिलारे यांनी दाखवून प्रत्यक्ष कृती करून घेतली. उपक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका रोहिणी खामकर तसेच स्वप्नाली मेमाणे, प्रिया काळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# करंजा येथे सागरी मासेमारी जनगणना प्रशिक्षण शिबीर

। उरण । प्रतिनिधी ।




करंजा मच्छिमार सोसायटी करंजा, ता. उरण येथे शनिवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी सागरी मासेमारी प्रशिक्षण शिबिराचे भारत सरकारमार्फत आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणार्थींना माहिती देताना विभागाचे अधिकारी दिनेश राव, प्रशिक्षणार्थी सेजल कोळी, रेश्मा कोळी व निशिकेत म्हात्रे, शिबिराला चेअरमन प्रदीप नाखवा, रायगड जिल्हा मच्छिमार सेलचे अध्यक्ष सीताराम नाखवा, माजी चेअरमन के.एल. कोळी, सेक्रेटरी जयंत कडू, कुंडेगाव सोसायटीचे चेअरमन रत्नाकर कोळी व इतर समाज बांधव उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

पान १ वरून

## अक्षया नाईक नगराध्यक्षपदाच्या उमेदवार

अभिनंदन करण्यात आले. त्याचप्रमाणे पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थितांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

अलिबाग नगरपरिषदेत २० नगरसेवकांच्या जागांसाठी निवडणूक होणार आहे. वॉर्ड क्रमांक पाचमधील नगरसेवकपदाच्या उमेदवारीसाठी काँग्रेसचे समीर ठाकूर, वॉर्ड क्रमांक सातमधील नगरसेवकपदाच्या उमेदवारीसाठी अभय म्हामुणकर यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. त्यांचेदेखील पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## स्कूलबसला भीषण अपघात

गेले. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने अक्कलकुवा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तीव्र उतारावरील वळणावर चालकाचा तोल सुटल्याने बस खोल दरीत उलटली. काही विद्यार्थी बसखाली दबले गेल्याने एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी अंत झाला.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. सर्व जखमी विद्यार्थ्यांना तात्काळ अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सातपुडा पर्वतरांगेतील या रस्त्यावर छोटे अपघात वारंवार घडत असले तरी, गेल्या दोन महिन्यांतील हा दुसरा मोठा अपघात असल्याने या रस्त्यांच्या सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा सुरू केला असून, सखोल चौकशी सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे या घाटरस्त्यावर नियमितपणे वाहनतपासणी आणि सुरक्षा उपाय वाढवण्याची मागणी केली आहे. या भीषण अपघातामुळे सातपुडा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## एकदिलाने काम करा

त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने काम करून ही निवडणूक लढण्यासाठी मेहनत घेणे गरजेचे आहे. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी शहराचा एक वेगळा कायापालट केला आहे. अलिबाग शहराची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे राज्यामध्ये अलिबाग शहराचे नाव कायमच घेतले जाते. महाविकास आघाडी एकत्र आल्याने आपला विजय हा निश्चित झाला आहे. मात्र, गाफील न राहता, काम करायचे आहे. प्रचारासाठी कालावधी कमी आहे. ही एकी अशीच ठेवून अलिबाग शहराची असलेली ओळख कायमच टिकवून ठेवा, असे आवाहन शेवटी जयंत पाटील यांनी केले.

## प्रचाराच्या तोफा थंडावल्या

मतदानाचा हक्क बजावतील. दुसऱ्या टप्प्यात तीन जागांवर सर्वाधिक उमेदवार आहेत. प्रत्येकी २२, ज्यामध्ये कैमूरमधील चैनपूर, रोहतासमधील सासाराम आणि गया शहर यांचा समावेश आहे. दरम्यान, लौरिया, चनपटिया, रक्सौल, सुगौली, त्रिवेणीगंज आणि बनमंखी या एकमेव जागा आहेत, जिथे प्रत्येकी फक्त पाच उमेदवार आहेत. यामुळे काही जागांवर सरळ लढती होऊ शकतात.

## दहशतवाद्यांना अटक

देशभरातील अनेक ठिकाणी हल्ले करण्याची योजना आखत आहेत. हे तिघे दहशतवादी दोन वेगवेगळ्या मॉड्यूलचा भाग आहेत. एटीएसच्या रडारवर असलेले दहशतवादी देशातील कोणत्या ठिकाणी हल्ला करण्याची योजना आखत आहेत हे शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे.

यापूर्वी, गुजरात एटीएसने ऑगस्टमध्ये चार दहशतवाद्यांना अटक केली होती. त्यापैकी दोघांना गुजरातमध्ये, एका दिल्लीत आणि एका नोएडामध्ये अटक करण्यात आली होती. हे चौघेही बनावट चलन रॅकेटमध्ये आणि लोकांना दहशतवादी संघटनांशी जोडण्यात सहभागी होते. ते असे ॲप्स वापरत होते जे आपोआप कंटेंट डिलीट करतात. हे चौघेही अल कायदाशी संलग्न असलेल्या अल कायदा इन द इंडियन सबकॉन्टिनेंटसाठी काम करत होते. ते सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि संशयास्पद ॲप्सद्वारे लोकांशी संवाद साधत होते.

## भिवगडाचा कडा कोसळला

वाढत असल्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

भिवगड अखंड संवर्धन समितीच्या माध्यमातून स्थानिक तरुण आणि इतिहासप्रेमी अनेक वर्षांपासून या किल्ल्याचे संवर्धन व स्वच्छता उपक्रम सातत्याने राबवत आहेत. किल्ल्याचे पुरातन अवशेष जपून ठेवण्यासाठी समिती वेळोवेळी प्रयत्न करत आली आहे. मात्र, आता झालेल्या या नुकसानीने डोंगराची मजबुती कमी होत असल्याचे संकेत मिळत असल्याचे समिती सदस्य सांगत आहेत. अलीकडेच इरशालवाडी येथे घडलेल्या दुर्घटनेने संपूर्ण राज्याला हादरवले होते. त्याच पार्श्वभूमीवर भिवगडावरही अशाच प्रकारची परिस्थिती उद्भवू नये यासाठी शासनाने तातडीने भूगर्भ तज्ज्ञांची पाहणी करून किल्ल्याच्या कड्यांचे मजबुतीकरण करण्याची गरज असल्याचे स्थानिकांचे मत आहे. कोणताही धोका टाळण्यासाठी शासनस्तरावर सकारात्मक भूमिका घेत त्वरित उपाययोजना होणे अपेक्षित आहे.

## विशाल शिंपीला दहा दिवसांची पोलीस कोठडी

कसून तपास करीत आहेत. मुख्य तक्रारदार महेश भगत यांनी व त्यांच्यासह १३६ जणांनी आपली फसवणूक झाल्याची तक्रार मुरुड पोलीस ठाण्यात नोंदवली होती. मुरुड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा तपास सुरू असून, प्रत्येक बाब तपासली जात आहे. कोणतीही बँक नसताना बँकेप्रमाणे आर्थिक व्यवहार करणे हा कायदेशीर गुन्हा असल्याने पोलीस याचा कसून तपास करीत आहेत.

प्रसन्न पुलेकरला लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार केल्याचे आढळून आल्याने व याची पोलीस तपासात समाधानकारक उत्तरे विशाल शिंपी याने न दिल्यामुळे मुरुड पोलिसांनी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिंपीला अटक करण्यात येऊन न्यायालयात हजर केले असता प्रथम त्याला पाच दिवसांची व पुन्हा न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

प्रसन्न पुलेकरला लाखो रुपये आर्थिक व्यवहार केलेल्या प्रत्येक व्यक्तीची मुरुड पोलिसांकडून कसून चौकशी करण्यात येत आहे. विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुरुड शहरातील १५ व्यक्तींची मुरुड पोलिसांकडून कसून चौकशी करण्यात आल्याचे समजत आहे. ज्यांनी ज्यांनी प्रसन्न पुलेकर याच्याशी लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार केले आहेत, त्यांचे बँक स्टेटमेंट तपासण्याचे काम सध्या पोलिसांकडून सुरु असून, संशयितांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावण्यात येत आहे.

याबाबत मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सांगितले आहे की, प्रसन्न पुलेकर प्रकरणात सहभागी असलेल्या सर्वांची चौकशी करण्याचे काम सुरु आहे.विशाल शिंपीने प्रसन्न पुलेकर याच्याशी लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार केल्याचे बँक स्टेटमेंटवरून सिद्ध झाल्याने त्याला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावले असता त्याने याबाबत समाधानकारक उत्तरे न दिल्याने त्याला अटक करून न्यायालयात हजर केले असता त्याला पोलीस कोठडी देण्यात आल्याचे सांगितले. याबाबतचा तपास सुरु असल्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत तिचे मालक सिध्दी सतीश शितोळे व मधुराणी सतीश शितोळे दोघीही रा. ४०९ वृंदावन गार्डन तुलिप, मुद्रे खुर्द, मु.पो.तालुका कर्जत जिल्हा रायगड यांनी त्यांची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत कायमची विक्री करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन-मौजे वैजनाथ तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३७/५ | एकुण क्षेत्र ०-२४-०० हे आर पॉ | २-५६ |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशीलांच्या विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १०/११/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
En.No.MH/३९९/२०१५
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१ मोबा. ९८२२६९११०९

### जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे तांबस ता. कर्जत जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**मौजे तांबस ता. कर्जत जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ- मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २४ | ८ | ०-३६-०० | ०.२२ |
| २४ | २१/ब | ०-४४-०० | ०.३५ |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री सुरेश गणु शेळके यांचे ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता,वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : १०/११/२०२५

**ॲड.सुनिल बबन मेंढरे**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा.
युको बँक शेजारी ता कर्जत जि. रायगड ४१०२०१
८०८७३७३७९०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १.कांता जयराम बागडे २. पांडुरंग जयराम बागडे ३. निकिता निलेश डांगरे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६/४ | १-१६-४० पैकी<br>विकत देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र ०-२१-०० | १-५८ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १०/११/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम. एल.एल.बी.
पत्ता- गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे सायगाव ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ. क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | वरकस क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १) | ५६९ | ०२-०२-०० | ०१-५१-०० | ०-५१-० | ०-८४ |
| | **जमीन मालकाचे नाव :- श्री. आशा अरुणकुमार भगत** | | | | |
| २) | ५७३ | ०१-०३-०० | ०-९४-०० | ०-०९-०० | ०-५० |
| | **जमीन मालकाचे नाव :- अशरफुनीस्सा शकुर अहमद धनसे** | | | | |

यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबे कब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट ताबा बयाना पावती अत्यारपत्र, साठे करार गहाण बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, बक्षिशी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे वकिलाची खात्री पटवून द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व भुजा विरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतीही हक्क व हे संबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- ०९/११/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा.ग स.कातकर सभागृह गाळा नं २ वाणी श्रीवर्धन

सही/-
**(ॲड.संतोष मारुती सापते)**

### जाहिर नोटीस

आमचे आशिल श्रीमती स्नेहा सुरेश गावंड, रा.चेंढरे, गुरव नगर, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरून तमाम लोकांस या नोटीसने कळवण्यात येते की,

कै. सुरेश हरीभाऊ गावंड यांनी त्यांचे मृत्युपत्र त्यांचे रहाते घरी म्हणजेच मु. पो.चेंढरे, गुरवनगर, ता. अलिबाग, जि. रायगड येथे दि. १६.०७.२०२५ रोजी लिहून ठेवले आहे. सदर मृत्यूपत्रामध्ये त्यांची पत्नी श्रीमती स्नेहा सुरेश गावंड, रा. चेंढरे, गुरव नगर, ता. अलिबाग, जि. रायगड हया ''लाभार्थी'' असून त्यावर श्री. अशोककुमार सदाशिव भगत रा. गुरवनगर, पिंपळभाट, ता. अलिबाग आणि श्री. प्रदिप रामचंद्र शेळके, रा. स्वामीसमर्थ नगर, पिंपळभाट, ता. अलिबाग यांनी साक्षीदार म्हणुन सहया केल्या आहेत. श्री. सुरेश हरीभाऊ गावंड यांचा मृत्यु दि. २३.०७.२०२५ रोजी झाला असुन नोंदणी कायदा १९०८ चे कलम ४० व ४१ नुसार सदरील मृत्युपत्र नोंदणी करणेकरीता मुख्यालय सहदुय्यम निबंधक अलिबाग, जि.रायगड यांचे कार्यालयात श्रीमती. स्नेहा सुरेश गावंड यांनी दि.०८.०९.२०२५ रोजी विनंती अर्ज केला आहे.

उक्त लाभार्थी व दोन साक्षीदार या तिघांचा मृत्युपत्र यथोचितरीत्या निष्पादीत झाले असलेबाबत जाबजबाब नोंदणी कायदा १९०८ चे कलम ६३ नुसार मुख्यालय सहदुय्यम निबंधक अलिबाग, जि. रायगड कार्यालयाने नोंदवीला आहे.

नोंदणी कायदा १९०८ चे कलम ४१ (२) (क) नुसार सदरचे मृत्युपत्र हे यथोचितरीत्या निष्पादित व स्वाक्षांकीत झाल्याची अधिक खातरजमा करणेकरीता मुख्यालय सहदुय्यम निबंधक अलिबाग, जि. रायगड यांचे कार्यालयास पूर्ण अधिकार असुन सर्व संबंधीतांनी हरकती नोंद मुख्यालस सह दुय्यम निबंधक अलिबाग व खालिल सही करणार यांचेकडे करावे असे या नोटीसने सुचीत करण्यात येत आहे. सदरचे मृत्युपत्रामध्ये खालिल परिशिष्ठ अ व ब मध्ये अनुक्रमे स्थावर मालमत्ता व जंगम मालमत्ता नमुद आहेत.

**परिशिष्ठ ए -स्थावर मिळकती-**

(१) मौजे चेंढरे, ता.अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ९१/३/ब/६ (PU-ID 27926897090), क्षेत्र ३.३०.०० आर.चौ.मी., आकार रू.३३/- मात्र ही बिनशेती मिळकत व (२) त्यावर उभारलेले घर ज्याचा ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ६७०/१ तळमजला, क्षेत्र सुमारे ९४७ चौ. फूट, व (३) ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ६७०/२ पहिला मजला, क्षेत्र सुमारे ४७३ चौ. फूट. व (४) ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ६७०/३ - दुसरा मजला, क्षेत्र सुमारे ४७३ चौ. फूट, ही घर मिळकत, (५) मौजे पनवेल, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं.७४६, सब प्लॉट नं. ४, हिस्सा नं. २ब/१सी हया मिळकतीवर उभारण्यात आलेल्या पर्ल कॅसल को. ऑप. हौ. सोसायटी मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.४, बांधीव क्षेत्र ४८५ चौ.फूट ही निवासी सदनिका.
(६) मौजे आवरे, ता.उरण येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ३/१, एकूण क्षेत्र ०.०९.७० हे.आर.चौ.मी., आकार रू.१.४४ पैसे मात्र हया शेती मिळकतीमधील कै. सुरेश हरीभाऊ गावंड यांचा निम्मा अविभाज्य हिस्सा.
७)मौजे आवरे, ता.उरण, जि.रायगड येथील पुढील वर्णनाच्या वडिलोपार्जित शेती मिळकती

| अ.क्र. | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| १ | १४/२ | ०.४५.५०<br>पो.ख ०.०२.५०<br>०.४८.०० | ७.१९ |
| २ | १६/९ | ०.०५.०० | ०.१२ |
| ३ | १६/१२ | ०.०१.५० | ०.०३ |
| ४ | १६/२६ | ०.०२.६० | ०.०९ |
| ५ | १७/३ | ०.०३.१०<br>पो.ख. ०.००.२०<br>०.०३.३० | ०.४१ |
| ६ | ६८/६ | ०.०७.०० | ०.२५ |
| ७ | ६८/११ | ०.१६.०० | ०.३१ |
| ८ | ८०/९ | ०.०६.०० | ०.२२ |
| ९ | ७८/५ | ०.०१.२०<br>पो.ख.०.००.८०<br>०.०२.०० | ०.२२ |
| १० | ८३/७ | ०.०१.०० | ०.०३ |
| ११ | १३४/१ | ०.१२.१०<br>पो.ख.०.०१.००<br>०.०२.०० | ०.७२ |
| १२ | १४५/१ | ०.०२.१०<br>पो.ख.०.००.२०<br>०.०२.३० | ०.०६ |

**परिशिष्ठ बी - जंगम मिळकती**

**ए) वित्तीय संस्थांमधील खाती**

| अ.क्र. | वित्तीय संस्थेचे नांव | खाते क्रमांक |
|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा श्रीबाग | बचत खाते क्र. ३०४०९२९१५४९ |
| २ | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पनवेल | सिनीअर सिटीझन बचत खाते क्र. ३८१८३९८७६२९ |
| ३ | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा थळ वायशेत | पब्लिक प्रॉव्हिडंट फंड खाते क्र. ११२३४५१३४१५ |
| ४ | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा थळ वायशेत | संयुक्त खाते क्र. ११२३४४७५६८२ |
| ५ | बँक ऑफ इंडिया, शाखा अलिबाग | खाते क्र. १२००१२११०००३४५ |

**बी) वित्तीय संस्थेमधील ठेवींचा तपशील**

| वित्तीय संस्थेचे नांव | रक्कम रूपये | वित्तीय संस्थेचे नांव | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| श्रीराम फायनान्स लिमीटेड. डीपॉझीट नं. SFL - 60062689 | ५,००,०००/- | श्रीराम फायनान्स लिमीटेड डीपॉझीट नं.SFL - 60615820 | १०,००,०००/- |
| श्रीराम फायनान्स लिमीटेड. डीपॉझीट नं.STFC - 51055802 | ५,००,०००/- | टाटा कंन्सल्टन्सी पोर्ट फोलिओ इनव्हेसमेंट | ५,००,०००/- |
| बजाज फीनसर्व | ५,००,०००/- | बजाज फीनसर्व | ६,८७,७८०/- |

**सी) पतसंस्थेमधील शेअर्स -**

| तपशिल | शेअर्स नंबर | रक्कम रूपये | तपशिल | शेअर्स नंबर | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| आदर्श नागरी सह. पत. मर्या. अलिबाग | १४७६ | ३८,०००/- | आदर्श नागरी सह. पत. मर्या. अलिबाग | १८३२ | ३८,०००/- |
| ..''.. | ३३६९ | ५,०००/- | ..''.. | १७३३ | २,०००/- |
| ..''.. | ६६१८ | ६२,०००/- | ..''.. | २५१६ | ५,०००/- |
| ..''.. | ६९७ | ५०,०००/- | कमळ नागरी सह. पत. मर्या. अलिबाग | ३५२७ | २०००००/- (५००००X४) |

**ड) पतसंस्थेमधील ठेवी वगैरे-**

| तपशिल | शेअर्स नंबर | रक्कम रूपये | तपशिल | शेअर्स नंबर | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| आदर्श नागरी सह. पत. मर्या. अलिबाग | ठेव ६४७३० | ५०००००/- | आदर्श नागरी सह. पत.मर्या. अलिबाग | ठेव ५०२८७ | ५०००००/- |
| ..''.. | ठेव ५१३१७ | १५००००/- | ..''.. | ठेव ६२५६२ | ५०००००/- |
| ..''.. | ठेव २१०९४ | १०००००/- | ..''.. | ठेव ७६२७० | १६०७२२/- |
| ..''.. | ठेव ७५४२५ | ११०९३८/- | ..''.. | ठेव ६९२४३ | १५००००/- |
| ..''.. | ठेव ५०२८८ | ५०००००/- | ..''.. | ठेव ५१३२५ | १५००००/- |
| ..''.. | ठेव ५१८१३ | १०००००/- | ..''.. | ठेव ५०३१० | ५०००००/- |
| ..''.. | ठेव ७५५७५ | १०००००/- | ..''.. | ठेव ६९२१९ | १५००००/- |
| ..''.. | ठेव ७५४२६ | २२१८७५/- | ..''.. | ठेव ७५५५९ | १०००००/- |
| ..''.. | ठेव ७६२७१ | २०००००/- | ..''.. | ठेव ७५६४९ | ५०००००/- |
| ..''.. | ठेव ४१३९० | ७२००००/- | ..''.. | ठेव ७९९३१ | २०००००/- |
| ..''.. | ठेव ७५५९८ | ७७६५६/- | ..''.. | ठेव ४१३६५ | ६०००००/- |
| | ठेव ४१३८५ | ५०००००/- | कमळ नागरी सह. पत.मर्या.अलिबाग | ठेव ८५१६३ | १२५०००/- |
| कमळ नागरी सह.पत.मर्या. अलिबाग | ठेव ७४१७९ | ७१३२२/- | ..''.. | ठेव ८५०२० | २०००००/- |
| ..''.. | ठेव ७४१८० | १९०६१४/- | आदर्श नागरी सह. पत. मर्या. अलिबाग | एमआयएस नं. ६१४०९ | ५३००००/- |
| आदर्श नागरी सह.पत.मर्या. अलिबाग | एमआयएस नं.६३४२१ | ५४३०००/- | ..''.. | एमआयएस नं. ६१४०८ | ६०००००/- |
| ..''.. | एमआयएस नं.६१४२० | ५०००००/- | .''.. | आर.डी.नं. ६९२२१ | ६५०००/- |

मुख्यालय सह दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयाने मृत्युपत्रावरील साक्षीदार व बेनीफीशीअरी यांचे जबाब नोंदवलेले असुन त्यांनी सदरचे मृत्यूपत्र कै.सुरेश हरीभाऊ गावंड यांनी निष्पादीत केल्याचे कथन केलेले आहे.

मृत्युपत्र यशोचितरीत्या निष्पादित झाले संदर्भात आणि उक्त परीशिष्टात नमुद स्थावर व जंगम मालमत्तेसंदर्भात कुणाची काही हरकत असल्यास त्यांनी भारतीय साक्ष संहिता २०२३ नुसार आवश्यक त्या सर्व प्रमाणित केलेल्या कागदपत्रे/अभिलेखासह १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात तसेच मुख्यालय सह-दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात कार्यालयीन कार्यरत दिवशी समक्ष येवून नोंदवावी. सदर दिनांकानंतर आलेल्या कोणत्याही हरकती विचारात घेण्यात येणार नाही, तसेच उक्त दिनांकापर्यंत कुणाची हरकत न आल्यास तद्नंतर उक्त मृत्युपत्राचा दस्त मुख्यालय सह-दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडे नोंदणी करणेत येईल, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०८/११/२०२५

**ॲड. अमित म. देशमुख, अलिबाग.**

# अलिबाग समुद्रकिनारा पर्यटकांनी बहरला

| अलिबाग | शहर प्रतिनिधी |

खऱ्या अर्थाने पावसाळा संपल्यानंतर पहिल्या आठवड्यात पर्यटकांनी पर्यटनासाठी रायगड जिल्ह्याकडे धाव घेतली आहे. विषेशतः अलिबाग तालुक्यातील पर्यटन स्थळांना पर्यटकांमुळे बहर आला आहे. यावेळी मुंबई, ठाणे, पुणे येथिल पर्यटकांनी निसर्गाने समृद्ध असलेल्या अलिबाग समुद्रकिनाऱ्यासह परिसरातील इतर समुद्रकिनाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. त्यामुळे येथिल व्यवसायिक देखील सुखावला आहे.

ऐन पर्यटनाच्या हंगामात म्हणजेच मे महिन्यात पावसाने हजेरी लावल्याने त्यावेळी पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या व्यावसायींकांचा हिरमोड झाला होता. कारण पुढील किमान चार महिने तरी पर्यटक याठिकाणी फिरकणार नव्हते. त्यानंतर दिवाळीत पर्यटनाचा नवा हंगाम सुरू होतो. परंतु, तेव्हा देखील पावसाने खोडा घातला आणि चार महिने पर्यटन हंगामाची वाट पाहणाऱ्या व्यावसायिकांचा पुन्हा हिरमोड झाला. त्यातच यंदा पडळेल्या अतिरिक्त पावसामुळे जिल्ह्यातील रस्त्यांची देखील बिकट परिस्थिती झाली आहे. सर्वत्र खड्ड्यांसह चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. परतीच्या पावसासह अवकाळी पडणाऱ्या धारांमुळे त्यात भर पडत राहिली.


(छायाचित्र : समीर मालोदे)

### स्थानिक व्यावसायिक सुखावले

त्यामुळे पर्यटकांनी जिल्ह्याकडे अक्षरशः पाठ फिरवली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने उसंती घेतल्याने येथील रस्त्यांसह परिसरातील व समुद्रकिनाऱ्यांवरील पावसाचे साचलेले पाणी, चिखल पुर्णतः सुकला आहे. त्यामुळे रस्त्यांवरील खड्डे तात्पुरते बुंजविण्यात आल्याने पर्यटकांनी रायगड जिल्ह्यासह अलिबाग तालुक्यातील पर्यटन स्थळांकडे धाव घेतलेली दिसत आहे.

दरम्यान, पाऊस संपल्यानंतरच्या पहिल्या आठवड्यातच पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात तालुक्यातील समुद्रकिनारी हजेरी लावली आहे. यावेळी पर्यटकांनी भरतीच्या वेळी पाण्यात भिजण्याचा आनंद लुटला. त्याचबरोबर पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावरील वॉटर स्पोर्टचा देखील मनमुराद आनंद लुटला. तसेच, काहींनी उंट सवारीकरत मज्जा लुटली. यादरम्यान, येथील हॉटेल, रिसॉर्ट आणि कॉटेजेस देखील पर्यटकांनी फुल्ल झाले होते. त्यामुळे व्यावसायिक प्रचंड प्रमाणात सुखावले होते. तसेच, छोट्या-मोठ्या व्यावसायीकांचा देखील धंदा तेजीत होता. तसेच, समुद्र देखील शांत झाल्याने मासळी देखील मोठ्या प्रमाणात मिळत आहे. त्यामुळे तालुक्यातील मच्छी बाजारांत देखील मासळी खरेदीसाठी पर्यटकांसह हॉटेल व्यावसायीकांनी मोठी गर्दी केली होती. त्यामुळे मच्छी विक्रेत्यांचा देखील धंदा तेजी होता.

# मुरूडच्या गुलाबी थंडीला पर्यटकांची पसंती



| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

सध्या पावसाने उसंती घेतल्याने आणि मुरुड शहरात गुलाबी थंडीचे वातावरण असल्याने रविवारी (दि.९) पर्यटकांनी मुरुडच्या किनाऱ्यावर येणे पसंत केले होते. तसेच, समुद्र शांत झाल्याने मासेमारी देखील चांगली होत असल्याने पर्यटकांनी ताजे मासे खाण्याचा मनसोक्त आनंद घेतला.


यादरम्यान, मुरुड समुद्रकिनारी असलेली सर्व हॉटेल, रिसॉर्ट आणि कॉटेजेस रंगरंगोटी व विविध प्रकारे रोशणाई करून सजविण्यात आली आहेत. त्याचबरोबर समुद्रकिनारी असलेले नवनवीन चविष्ट पदार्थांचे स्टॉल, तसेच घोडसावरी, मोटर बाईक व वॉटर स्पोटर्स याकडे पर्यटक जास्त आकर्षित होताना दिसत आहेत. मुरूड नगरपालिकेने समुद्रकिनारी असलेल्या विश्राम धाम बागेचे नूतनीकरण केल्याने त्याचा लाभ पर्यटकांना झाला आहे. त्यातच जलदुर्ग जंजिरा व पद्मदुर्ग पाहण्यासाठी राज्यभरातून पर्यटक येत आहेत. मुरुडपासून जवळच असणारे गारंबी धरण, कुडे मांदाड लेणी, खोकरी व दत्तमंदिर या पर्यटन स्थळावर स्वच्छता करून खाण्यापिण्याचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. त्यामुळे याठिकाणी देखील शनिवार-रविवारी मोठ्या प्रमाणात पर्यटक हजेरी लावत होते.

> **शनिवार-रविवार तसेच सार्वजनीक सुट्टींसाठी मुरुड तयार आहे. पर्यटाकांचे हाल होऊ नयेत म्हणून पिण्याचे पाणी, शहरातील रस्ते व समुद्रलकिनारा स्वच्छता याकडे जातीने लक्ष दिले जात आहे. पर्यटकांनी समुद्रात जाताना भरती-ओहोटीचे भान ठेऊन समुद्राच्या लाटांचा सुरक्षित आनंद घ्यावा.**
> **- सचिन बच्छाव, मुख्याधकारी, मुरुड नगरपालिका**

# दागिने लंपास करणाऱ्या दुकलीला अटक

| पनवेल | प्रतिनिधी |

करंजाडे येथील सुदर्षन शिंगाडे यांच्या घरातील सामान हे नवीन पनवेल तक्का येथे शिफ्टिंग करण्याचे काम संदीपकुमार जैस्वाल (२४) व त्याचा सहकारी गौरव शुल्का (२८) यांना दिले होते. त्यावेळी त्यांनी सामान पॅकिंग करत असतात घरातील लाकडी कपाटामध्ये एका डबीमध्ये ठेवलेल्या सोन्याच्या अंगठ्या, कानातील रिंग, सोन्याचे मणी व देवींची मूर्ती असा लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास केला होता. याबाबतची माहिती सुदर्शन शिंगाडे याना मिळताच त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार



वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्षनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक फडतरे, पोलीस हवालदार अमोल पाटील, शिपाई विषाल दुधे व नाईक सुभाष राठोड आदींच्या पथकाने या दोन्ही आरोपींना मुंबईतून ताब्यात घेतले. तसेच, त्यांच्याकडून सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत.

# एमआयडीसी परिसरात रुग्णालयाची मागणी

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या रासायनिक उद्योगांमुळे, दुर्घटनांमुळे आणि प्रदूषणामुळे स्थानिक नागरिक, कामगार व विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या सुरक्षेबाबत तीव्र असंतोश निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर स्वप्नील भोवड यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सविस्तर कायदेशीर अर्ज सादर करून या ठिकिाणी सरकारी रुग्णालय उभारणीची मागणी केली आहे. यावेळी स्वप्नील भोवड यांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे की, रसायनी एमआयडीसी परिसरात हजारो कामगार आणि शेकडो नागरिक राहतात. येथे वारंवार होणारे रासायनिक अपघात, वायूगळतीच्या घटना आणि वैद्यकीय सुविधा अभावी जीवितहानीची शक्यता वाढली आहे. त्यामुळे राज्य शासनाने आणि एमआयडीसीने सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# रेल्वेच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**पनवेल** : पनवेल जवळील सोमाटणे रेल्वे स्टेशन जवळ रेल्वेच्या धडकेने एका इसमाचा मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत. ही व्यक्ती सोमाटणे रेल्वे स्टेशन जवळ रेल्वेने धडक दिल्याने बेशुद्ध अवस्थेत मिळून आली. त्याला पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु, ही व्यक्ती रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले आहे. या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध पनवेल पोलीस करीत आहेत.

# वाहतूक शाखेच्यावतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील आजिवली येथील जनता विद्यामंदिरात नवीन पनवेल वाहतुक शाखेच्यावतीने वाहतुक नियमांचे पालन करण्याबाबत विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना गाडी चालवताना सीट बेल्ट लावणे, दारू पिऊन गाडी चालवू नये, लेन कटिंग करू नये, वाहन चालवताना मोबाइल फोनचा वापर करू नये, विरूद्ध दिशेने वाहने चालवू नयेत, वाहने रस्त्यावर उभी करू नयेत, विद्धार्थ्यांनी गाडी चालविण्याचा परवाना जोपर्यंत येत नाही तोपर्यंत कोणतेही वाहन चालू नये, तसेच सर्व वाहतुकीचे नियम आपल्या पालकांना समजावून सांगणे असे विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. तसेच, वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल माहिती देऊन इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी, सायबर गुन्हे आणि प्रकार, मोबाईल वापरताना घ्यावयाची काळजी, सायबर हेल्पलाइन १९३०, लैंगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण संरक्षण कायदा, बालविवाह कायदा आणि बालविवाहाचे दुशपरिणाम याबद्दल माहिती देऊन बालविवाह होऊ नयेत, असे आवाहन केले.

# गुरांच्या वैरणीचा प्रश्न ऐरणीवर

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

परतीच्या पावसाने भातशेतीचे प्रचंड नुकसान झाल्याने बळीराजा पुरता हतबल झाला आहे. अनेकांचे उभे भातपीक शेतातच कुजले तर काहींच्या भाताला कोंब फुटले आहेत. मात्र, या सगळ्यांमध्ये भात झोडणी झाल्यावर निघणारा पेंढा उरलाच नसल्यामुळे गुरांच्या वैरणीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे बळीराजा आणि पषुपालक प्रचंड चिंतेत आहेत.



परतीच्या पावसामुळे रायगडातील काहीजणांच्या हातात उरला सुरलेला भात हाती आला. परंतु, भिजलेला भात काळा पडला आहे. त्यामूळे त्याला बाजारात अत्यल्प किंमत मिळेल. तसेच, भिजलेल्या पेंढ्यामुळे गुरांची वैरण गेली आहे. उभे भातपीक सडल्याने आता पेंढाच उरला नाही. शिवाय पेंढा भिजल्याने तो खाण्यायोग्य व साठवणीसाठी योग्य राहिला नाही. त्यामुळे आता पशुधनाला खायला तरी काय घालायचे? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडला आहे. कारण पावसाळ्यानंतर जनावरांसाठी पेंढा हे महत्वाचे खाद्य आहे. परंतु, आता पेंढाच नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी चिंता निर्माण झाली आहे. आता ऐवजी पर्यायी खाद्य द्यावे लागेल. परंतु, त्याच्या किमती प्रचंड आहेत.

> **शेतकऱ्यांनी खाण्यासाठी ठेवलेला भात खराब झाल्याने त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच, हाती पैसा नसल्याने कुटुंबाचा खर्च कसा भागवावा, ही देखिल भ्रांत शेतकऱ्यांना पडली आहे. दूध दुभते पदार्थ विकून शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक हातभार लागतो तो देखील पेंढ्या अभावी कमी होणार आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना शेतीच्या नुकसान भरपाई बरोबरच जनावरांच्या खाद्याची व्यवस्था देखील करावी. तसेच, गरज असेल तिथे चारा छावण्या उभाराव्या.**
> **- शरद गोळे, अध्यक्ष, कृषी मित्र संघटना, सुधागड**

# 'प्रकल्पग्रस्त भूमीपुत्रांना नोकरीत घ्या'

**नेरळ** : कोकण कृषी विद्यापीठाच्या कर्जत येथील भात संषोधन केंद्रात सध्या सुरू असलेल्या पदभरतीमध्ये फक्त दापोली परिसरातील मुलांना नोकर भरती सामावून घेत असल्याचे लक्षात आल्याने त्या विरोधात आवाज उठवण्यात आला आहे. याबाबत भूमिपुत्रांना नोकर भरती सामावून घेण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. तसेच, ही मागणी मान्य न झाल्यास उपोषण करण्याचा इशारा देखील त्यांच्याकडून दिला गेला आहे. मधल्या काळात संबंधित प्रशासनाने संपादित केलेल्या जमीन मालकांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे सरकारी सेवेत सामावून घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या होत्या. प्रत्यक्षात सरकारी सेवेच्या पदभरतीवेळी भूमिपुत्रांना वगळून फक्त दापोली परिसरातील मुलांनाच नोकऱ्या देत असल्याचे दिसून आल्याने शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



## पिण्याच्या पाण्याची समस्या सुटणार | रावढळ येथे वनराई बंधाऱ्यांची निर्मिती

# रेशिम बंधू परिवाराचा स्तुत्य उपक्रम

| महाड | सुजित धाडवे |

सध्या उन्हाळा वाढत चालला असून मानव जातीपासून सर्वच सजीव जीवांना या कडक उन्हाचा त्रास जाणवू लागला आहे. तसेच, अनेक ठिकाणी पाण्याची कमतरता जाणवू लागली आहे. त्यामुळे पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. त्यातच ज्या ठिकाणी पाण्याचे स्रोत उपलब्ध आहेत ते जतन करून ठेवणे काळाची गरज वाटू लागली आहे. त्यामुळे 'पाणी अडवा पाणी जिरवा' ही संकल्पना लक्षात घेऊन महाड तालुक्यातील रावढळ गावातील रेशिम बंधू परिवार सामाजिक विकास संस्थेने श्रमदानातून ३ वनराई बंधारे बांधले आहेत. या लोकोपयोगी कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



संस्थेच्या सदस्यांनी रविवारी (दि.९) सकाळी ७ वाजताच्या सुमारास एकत्र येत रावढळ गावाच्या बाजूला असणाऱ्या नागेश्वरी नदी पूर्वेकडील जंगलातून वाहणाऱ्या ओहोळावर श्रमदानातून बंधारा बांधण्याच्या कामाला सुरुवात केली होती. सकाळी ११ वाजेपर्यंत त्यांनी सुमारे तीन ते साडेतीन फुट लांबीचा वनराई बंधाऱ्याची बांधणी केली. हे बंधारे सिमेंटच्या पिशव्यांमधून माती, वाळू भरून खाली दगडाच्या साहाय्याने यशस्वीरितीने बांधण्यात आले.त्यामुळे जंगलातून वाहणारे हजारो लिटर पाण्याचा साठा बंधाऱ्यात होणार आहे. या वनराई बंधाऱ्यात एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत पाण्याचा साठा शिल्लक राहणार असल्याने जंगलातील वन्यप्राणी, पक्षी आणि गावातील पाळीव प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सुटणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शिवाजी रेशिम यांनी सांगितले.

> **उन्हाळ्याची चाहूल लागताच पाण्याचे स्त्रोत तळ गाठतात. त्यामुळे वनराई बंधारे शेतकऱ्यांसह पशु-पक्ष्यांसाठी वरदान ठरतील. वाहत्या पाण्याच्या ठिकाणी सिमेंटच्या गोणींमध्ये माती भरुन बंधाऱ्यांची निर्मिती केली तर पाण्याच्या पातळीत वाढ होऊन त्यातून पुढील अनेक दिवस गुराढोरांची तहान भागविली जाईल. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना देखील सोयीचे होऊन त्यातून चांगली पीके घेता येतील.**
> **- अनंत रेशिम, स्थानिक शिक्षक**

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष राजू रेशिम, अध्यक्ष शिवाजी रेशिम, दत्ताराम रेशिम, अनंत रेशिम, ज्ञानदेव रेशिम, परेश रेशिम, नंदकुमार रेशिम, अमित रेशिम, अनिकेत रेशिम, अजिंक्य रेशिम, प्रणय रेशिम व प्रसाद रेशिम आदींनी मेहनत घेतली.

## निवडक

### पतीचा खून करणाऱ्या पत्नी, प्रियकराला जन्मठेप

**पनवेल** : प्रियकराच्या मदतीने पतीचा खून करणाऱ्या पत्नी व प्रियकराला पनवेल येथील अतिसत्र न्यायाधीष एस.सी. शिंदे यांनी जन्मठेपीची शिक्षा ठोठावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रितीदेवी हिचा विवाह हरिओम यांच्याषी झाला होता. दरम्यान, प्रितीदेवी हिचे गौरवसिंग याच्याषी प्रेमसंबंध होते. हे तिघेही कानपूर येथील राहणारे असून गौरवसिंह व प्रितीदेवी यांच्या प्रेमात हरिओम सिंगचा अडथळा असल्याने दोघांनी त्याचा काटा काढण्यासाठी त्याला पनवेल परिसरात नोकरी लावण्याच्या बहाण्याने पळस्पे परिसरात आणले होते. पळस्पे येथील मोकल चाळ येथे भाड्याची रूम घेऊन दुपारी तिघेही रूममध्ये गेले. तिथे गौरवसिंग व प्रितीदेवी यांनी चाकूने हरिओमचा गळा चिरून व अनेक ठिकाणी वार करून खून केला. शेजाऱ्यांना भांडणाचा आवाज आल्याने त्यांनी दरवाजा ठोठावला. त्यावेळी प्रितीदेवी व गौरवसिंग रक्ताने माखल्याचे दिसले. त्यावेळी शेजाऱ्यांनी पनवेल शहर पोलीसांना कळिवले. पोलीस तातडीने त्याठिकाणी पोहोचले असता पोलिसांना हरिओमसिंग मृत अवस्थेत आढळला. त्यानंतर दोघांना तात्काळ अटक करण्यात आली. दरम्यान, दोन्ही आरोपीने उलटसुलट बचाव घेत गुन्हा केल्याचे नाकारले. सरकारी वकील वाय.एस. भोपी यांनी पुराव्याच्या आधारे खून असल्याचे कोर्टास पटवून दिले. यावेळी दोन्ही आरोपींनी खून केल्याचे न्यायालयाला पटवून दिले. न्यायालयाने सरकारी वकिलांचा युक्तीवाद मान्य करून दोन्ही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे.



### नेरळ स्थानकातील सरकता जिना कार्यरत

**नेरळ** : स्थानकात मध्य रेल्वे प्रशासनाकडून फलाट क्रमांक एकवर सरकता जिना उभारण्यात आला आहे. या सरकत्या जिन्याचे काम अनेक महिने रखडले होते. अखेर हा सरकता जिना प्रवासी वर्गाच्या सेवेत आला असून नेरळ प्रवासी संघटना यांनी त्याबद्दल आभार मानले आहेत. तर, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी हि मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. नेरळ स्थानकात विविध विकास कामे सुरु आहेत. वार्षभर फलाट क्रमांक एकवर उभारण्यात येत असलेल्या सरकत्या जिन्याचे बांधकाम ठप्प होते. याबाबत माध्यमांनी आवाज उठवल्यावर मध्य रेल्वे प्रशासन आणि मुंबई रेल कोर्पोरेशन यांना जाग आली. मुंबई येथून येणारे पर्यटक प्रवासी यांच्यासाठी हा सरकता जिना महत्वाचा असल्याने या सरकत्या जीनांचे काम पूर्ण व्हावे यासाठी नेरळ प्रवासी संघटना देखील सतत पाठपुरावा करीत होती. नेरळ स्थानकात माथेरान येथे जाण्यासाठी येणारे पर्यटक याच स्थानकात मोठ्या संख्येने उतरत असतात आणि त्यामुळे प्रवशांसाठी हा सरकता जिना महत्वाचा समजला जात होता.



### लाईन आळीतील दुकान फोडले

**पनवेल** : पनवेल शहरात पुन्हा एकदा दुकानफोडीची घटना घडली आहे. लाईन आळी परिसरातील वेदक यांचे अगरबत्तीचे दुकान चोरट्याने फोडून गल्ल्यातील रक्कम घेऊन फरार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पाहणी केली. वेदक यांच्या अगरबत्ती दुकानासमोर असलेल्या हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेजमधून काही ठोस माहिती मिळते का, याचा तपास पोलीस कर्मचारी करत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर या चोरट्याचा शोध लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




### पक्ष्यांविषयी जागरूकता कार्यक्रम

**पनवेल** : ज्येष्ठ पक्षी निरीक्षक तथा साहित्यिक मारुती चितमपल्ली यांचा वाढदिवस (५ नोव्हेंबर) व दिवंगत डॉ. सलीम अली यांची जयंती (१२ नोव्हेंबर) याचे औचित्य साधत हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून साजरा केला जातो. राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनाच्या दृश्टीने निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व विषद व्हावे, लोकजागृती व्हावी या उद्देशाने या सप्ताहाचे आयोजन केले जाते राज्यातील पक्ष्यांचे महत्त्व प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या संरक्षणाप्रती जबाबदारी स्पश्ट व्हावी या विषयी शासन स्तरावर, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना तसेच वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून या सप्ताह मध्ये पक्षी निरीक्षण, पक्ष्यांविषयी जागरूकता, स्पर्धांचे आयोजन तसेच शाळा-कॉलेज या ठिकाणी पक्षी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजित केले जातात. याच हेतूने पनवेल येथील नेचर फ्रेन्ड सोसायटी, ग्रीन वर्क्स ट्रस्ट आणि वनपरिक्षेत्र पनवेल परिमंडळ पोयंजे यांच्या संयुक्त विद्यमानने अजिवली येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांना शनिवारी (दि.८) पक्षी संवर्धन व पक्षी विशयी रंजक माहिती देण्यात आली.

### महापालिकेच्या मुख्यालयासमोर ठिय्या आंदोलन

**पनवेल** : महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरी समस्यांबाबत प्रहार जनषक्ती पक्ष, आदिवासी विकास परिषद आणि अन्याय अत्याचार निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने पालिका मुख्यालयासमोर ठिय्या आंदोलन घेण्यात आले. यावेळी शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त गणेष शेटे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले व मागण्यांबाबत चर्चा केली. त्यानंतर पालिका प्रषासनाकडून ६ मागण्या मान्य केल्या असून बाकीच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून त्यावर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी शिष्ठमंडळात सुनील शिरीशकर, ॲड. मनोज टेकाडे, ॲड. अजय तापकीर, संतोष चाळके, बी.पी. लांडगे, अजय कदम, राहुल तेलंग आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# प्रवाशांना वकील हवा आहे

मुंबईत रेल्वे अपघात नित्याचे आहेत. चालत्या रेल्वे लोकलमधून पडल्यामुळे किंवा रुळ ओलांडताना रोज कित्येक जण मरण पावतात. पण गेल्या आठवड्यातला गुरुवारचा अपघात म्हणजे अप्रत्यक्षपणे रेल्वे कर्मचाऱ्यांनी केलेले खून होते. सहा नोव्हेंबर रोजी बोरीबंदरला रेल्वे कर्मचाऱ्यांनी अचानक धरणे आंदोलन केले. रेल्वे रुळावर उतरून त्यांनी गाड्या अडवल्या. ऐन संध्याकाळच्या वेळेला लोकल तसेच बाहेरगावी जाणाऱ्या गाड्या थांबून राहिल्या. लाखो प्रवाशांचे वेळापत्रक बिघडले. बोरीबंदरकडे येणाऱ्या गाड्या ठिकठिकाणी थांबून राहिल्या. त्यामुळे लोक रुळावर उतरून चालत नजीकच्या स्टेशनात वा बस पकडण्यासाठी रस्त्यावर जाण्याचा प्रयत्न करू लागले. त्याच प्रयत्नात सँढहर्स्ट रोड स्टेशनजवळ रुळावर असणाऱ्या चार प्रवाशांना मागून येणाऱ्या लोकलने उडवले. त्यात दोन जणांचा हकनाक बळी गेला आणि दोन जण जखमी आहेत. कहर म्हणजे रेल्वे कर्मचाऱ्यांचे आंदोलन हे आपल्या आधीच्या पापांवर पांघरूण घालण्याची मागणी करण्यासाठी होते. नऊ जून रोजी मुंब्र्याजवळ दोन लोकल गाड्यां प्रचंड जवळ आल्या व त्यात अनेक प्रवासी खाली पडले होते. त्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले होते. रेल्वे अभियंत्यांच्या बेदरकारीमुळे हा अपघात झाल्याचा निष्कर्ष काढून रेल्वेच्या पोलिसांनी या प्रकरणी गुन्हे दाखल केले होते. पण याबाबतच कांगावा आणि गोंगाट करीत रेल्वे कर्मचाऱ्यांनी परवा बोरीबंदरला आंदोलन केले आणि त्यात आणखी दोन माणसांना मारले. या दोन्ही प्रकरणात सरकारने अत्यंत कडक भूमिका घेण्याची गरज आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संघटित दादागिरीला अजिबात भीक न घालता त्यांच्यावर गुन्हे दाखल करायला हवेत. मुंब्रा प्रकरणात अभियंत्यांविरुध्द आणि बोरीबंदरमध्ये आंदोलन करणाऱ्या संघटनेविरुध्द खटले दाखल होऊन त्यांना सजा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. लोकल ही लोकांची जीवनवाहिनी असल्याने मुंबईकरांना तिच्याविषयी प्रेम आहे. पण या लोकलचे कारभारी म्हणजेच रेल्वेचे अधिकारी हे अत्यंत माजलेल्या संस्थानिकांचे अवतार आहेत. प्रवाशांच्या अडचणींबाबत हे अत्यंत बेदरकार असतात. लोकल गाड्या चालवून आपण जणू लोकांवर उपकार करतो अशी त्यांची भावना असते.

### रेल्वे अभियंत्यांची बेपर्वाई

वास्तविक या रेल्वेवाल्यांचे पगार लोकांच्या पैशांतून होतात. मुंबईची लोकल सेवा फायद्यात असल्याचे पूर्वी दिसून आले आहे. तरीही तिच्यात लोकांच्या फायद्याच्या सोई होत नाहीत. अधिक गाड्या सोडल्या जात नाहीत. गाड्या वेळेवर नसतील तर त्याची पूर्वसूचना दिली जात नाही. एसी गाड्यांमध्ये एसी चालत नाही किंवा डब्यांचे दरवाजे लागत नाहीत. तरीही लोक नाइलाजाने प्रवास करीत असतात. मुंब्रा येथे जून महिन्यात झालेला अपघात हाही रेल्वे अभियंत्यांच्या बेफिकिरीचा उत्तम नमुना होता. अपघाताच्या आदल्या दिवशी म्हणजे आठ जूनला जोरदार पाऊस झाला होता. त्यामुळे रेल्वे रुळांशेजारचा नाला तुंबून रुळाखालची खडी वाहून गेली होती. परिणामी दोन रुळांपैकी एक रुळ खाली व एक वर अशी अवस्था झाली होती. परिणामी तिथल्या वळणापाशी, येणाऱ्या आणि जाणाऱ्या गाड्या एका बाजूला झुकून एकमेकांजवळ येत होत्या. रेल्वे रुळांची सतत पाहणी केली जात असते. त्यानुसार रेल्वे अभियंत्यांनी ती केली होती व रुळांखालची खडी वाहून गेल्याचे त्यांच्या ध्यानात आले होते. तरीही त्यांनी यावर काहीच उपाय केला नाही. परिणामी त्या दिवशी दोन गाड्या जवळ आल्या व दरवाज्यात लटकलेले प्रवासी एकमेकांवर आदळून खाली पडले. त्यात पाच जण मेले. कहर म्हणजे रेल्वे प्रशासनाने केलेल्या चौकशीत या प्रकाराबद्दल प्रवाशांनाच जबाबदार धरले होते. प्रवाशांच्या पाठीवर लटकवलेल्या मोठ्या बॅगा दुसऱ्या लोकलमधल्या प्रवाशांवर आदळल्या व त्यातून तोल जाऊन ते खाली पडले असा निष्कर्ष त्यात काढण्यात आला होता. म्हणजेच आपल्या रेल्वे अभियंत्यांना वाचवण्याचा हा प्रयत्न होता. पण या प्रकारणी रेल्वे पोलिसांच्या चौकशीत व व्हीजेटीआय या नामांकित इंजिनिअरिंग संस्थेने केलेल्या तपासणीत अभियंत्यांनी केलेली हलगर्जी उघड झाली. साहजिकच पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला. याला विरोध करून अभियंत्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न रेल्वे कर्मचाऱ्यांनी करावा ही अत्यंत घृणास्पद बाब आहे. त्याचसंदर्भात आंदोलन करताना त्यांनी आणखी दोन बळी घेतले. याचा करावा तितका निषेध कमी आहे.

### कर्मचाऱ्यांबाबत सहानुभूती, पण...

रेल्वेरुळांच्या पाहणीचे काम अत्यंत कठीण असते. दिवसाचे २४ तास व ३६५ दिवस ते करावे लागते. लोकल गाड्या पहाटे दोन तास बंद असतात. पण त्या काळात लांब पल्ल्याच्या गाड्यांची ये-जा चालूच असते. त्यांना अडथळा न करता सतत रुळांवर लक्ष ठेवणे व दुरुस्त्या करणे हे अत्यंत जिकिरीचे असते. यासाठी गँगमन नेमले जातात. हे बहुतेकदा कंत्राटी असतात. दर महिन्याला भारतभरात अशी पाहणी करताना अनेक रेल्वे कामगार रेल्वेखाली येऊन मरतात. या तपासणी कामगारांची संख्या कमी आहे व त्यांना अत्यंत कमी वेतन मिळते.लांब पल्ल्याच्या गाड्यांमधून सर्व प्रकारची घाण रेल्वे रुळांवर पडत असते. ऊन,थंडी, वारा, पाऊस काहीही असले तरी या कर्मचाऱ्यांना काम करावेच लागते. याबद्दल कोणालाही सहानूभूती वाटेल. त्याबाबत रेल्वे कामगारांनी आंदोलन केले तर जनतेचा त्यांना पाठिंबाच राहील. पण हे सर्व असले तरी मुंब्र्यामध्ये अभियंत्यांनी ज्या प्रकारची बेपर्वाई दाखवली व ज्यामुळे लोकांचे बळी गेले ते कधीही माफ करता येण्यासारखे नाही. हे बळी गेलेले लोकही अत्यंत वाईट स्थितीत रोज प्रवास करीत असतात व आपल्या प्रवासासाठी कष्टाचे पैसे मोजत असतात हे विसरून चालणार नाही. हे मेलेले प्रवासी रेल्वे कर्मचाऱ्यांचे भाऊ, मित्र किंवा आजूबाजूला राहणारे असतात. या प्रवाशांकडे दुर्लक्ष करून अभियंत्यांना वाचवण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलन करावे हे माणुसकीला व न्यायाला धरून नाही. या संदर्भात सरकारने कठोर कारवाई करायला हवी. मात्र त्याच सोबत रेल्वे कर्मचारी व अभियंते यांच्या जर अडचणी असतील तर त्याही त्वरीत दूर करायला हव्यात. पण यातली ठळक बाब हीच आहे की, मुंबईतील लोकल प्रवाशांच्या जिवांची कोणालाच पर्वा नाही. मुंब्र्याचा अपघात झाला तेव्हा सरकारनेही प्रवाशांनाच अप्रत्यक्षपणे जबाबदार धरले होते. डब्याच्या बाहेर लटकणारे प्रवासी व त्यांच्या बॅगांमुळेच दुर्घटना घडली असा निष्कर्ष काढून सर्व लोकल डब्यांना दारे बसवण्याची येडपट योजना जाहीर केली होती.सरकारातील कोणीही मंत्र्यांने वा अधिकाऱ्याने लोकल गाडीतून प्रवास केलेला नसल्याचा हा पुरावा होता. मुंबईतील लोकल गाड्यांना इतकी प्रचंड गर्दी असते की दरवाजे लावले तर त्यात घुसमटून आणखी माणसे मरतील हे उघड आहे. तरीही सरकार ही योजना पुढे रेटतेच आहे. एकूण मुंबईतील लोकल प्रवाशांच्या जिवाला काहीही किंमत नाही. आपले विरोधी पक्षदेखील इतर तमाम गोष्टींविषयी बोलतात. त्यांनी आता तरी निदान प्रवाशांचे वकील व्हावे अशी अपेक्षा आहे.

विचार

# करकपातीनंतरची उलाढाल काय सांगते?

***अलिकडेच समोर आलेल्या जीएसटी संकलनाच्या आकड्यांनी देशाच्या आर्थिक स्थितीची चुणूक दाखवली. त्यामुळे गेल्या महिन्यात जीएसटी संकलन किती झाले, जीएसटी महसूल अंदाजापेक्षा जास्त मिळाला की कमी, त्याचा मागील काळाशी संबंध जोडला असता काय चित्र दिसते, याची चर्चा सुरु आहे. दरम्यान, नेमकी आकडेवारी समोर आल्याने सणासुदीमुळे वाहनविक्रीमध्ये मोठी वाढ झाल्याचे पहायला मिळाले.***




महेश देशपांडे

सरत्या काळामध्ये देशाने जोमदार खरेदीयात्रा अनुभवली. दिवाळीच्या खरेदीने अनेकांना चकीत केले. त्या पाठोपाठ आलेल्या जीएसटी संकलनाच्या आकड्यांनीही देशाच्या आर्थिक स्थितीची चुणूक दाखवली. अर्थनगरीमध्ये याच अनुषंगाने उठलेले तरंग अनुभवायला मिळत आहेत. त्यामुळे जीएसटी संकलन किती झाले, जीएसटी महसूल अंदाजापेक्षा जास्त मिळाला की कमी, त्याचा मागील काळाशी संबंध जोडला असता काय चित्र दिसते, याची चर्चा सुरु आहे. दरम्यान, नेमकी आकडेवारी समोर आल्याने सणासुदीमुळे वाहनविक्रीमध्ये मोठी वाढ झाल्याचे पहायला मिळाले.

उत्सवकाळातील खरेदीमुळे ऑक्टोबरमध्ये एकूण जीएसटी संकलन ४.६ टक्क्यांनी वाढून सुमारे एक लाख ९६ हजार कोटी झाले. स्वयंपाकघरातील वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमोबाईल्ससह ३७५ वस्तूंवर नवीन वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) दर २२ सप्टेंबरपासून लागू झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिवाळीपूर्वी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात जीएसटी दर कपातीची घोषणा केल्यानंतर ग्राहकांनी जीएसटी दर कपातीच्या अंमलबजावणीची वाट पाहत आपले खरेदीचे निर्णय पुढे ढकलले. सरकारी आकडेवारीनुसार, ऑक्टोबरमध्ये एकूण जीएसटी संकलन एक लाख ९६ हजार कोटी रुपये होते. ते ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या एक लाख ८७ हजार कोटी रुपयांच्या संकलनापेक्षा ४.६ टक्के जास्त आहे. या वर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये करसंकलन अनुक्रमे एक लाख ८६ हजार कोटी रुपये आणि एक लाख ८९ हजार कोटी इतके म्हणजेच किंचित कमी होते. ऑक्टोबरमध्ये जीएसटी संकलनात झालेली ४.६ टक्के वार्षिक वाढ मागील महिन्यात झालेल्या सरासरी नऊ टक्क्यांच्या वाढीपेक्षा कमी आहे. स्थानिक विक्रीचा निर्देशक असलेला एकूण देशांतर्गत महसूल ऑक्टोबरमध्ये दोन टक्क्यांनी वाढून एक लाख ४५ हजार कोटी रुपये झाला. दुसरीकडे, आयात कर अंदाजे १३ टक्क्यांनी वाढून ५० हजार ८८४ कोटी झाला. जीएसटी परतावा देखील वर्षानुवर्षे ३९.६ टक्क्यांनी वाढून २६ हजार ९३४ कोटी रुपये झाला. ऑक्टोबर २०२५ मध्ये निव्वळ जीएसटी महसूल एक लाख ६९ हजार कोटी रुपये होता. तो मागील वर्षाच्या तुलनेत ०.२ टक्क्यांनी वाढला आहे.

दरम्यान, या अनुषंगाने काही भाकितेही समोर येत आहेत. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये जीएसटी महसूल सरकारच्या बजेट अंदाजांपेक्षा जास्त असेल. अहवालानुसार, राज्यांमध्ये करदरांच्या पुनर्रचनेनंतरही एकूण जीएसटी महसूल मजबूत राहील. हे भारतीय अर्थव्यवस्थेतील करप्रणालीची स्थिरता दर्शवते. ‘एसबीआय रिसर्च’ अहवालात म्हटले आहे, की आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये जीएसटी संकलन बजेट अंदाजांपेक्षा जास्त असेल. अहवालात ‘जीएसटी कौन्सिल’ने जाहीर केलेल्या विकासदर अंदाजांवर बेतून हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यात म्हटले आहे, की कर दरांच्या अलिकडील पुनर्रचनेनंतरही बहुतेक राज्यांना आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये निव्वळ फायदा दिसेल. सप्टेंबर २०२५ मध्ये लागू केलेल्या जीएसटी दर पुनर्रचनेअंतर्गत आता शून्य टक्के, पाच टक्के, १८ टक्के आणि ४० टक्के अशी कररचना अस्तित्त्वात आहे. या बदलामुळे महाराष्ट्राला अंदाजे सहा टक्के फायदा होईल तर कर्नाटकला १०.७ टक्क्यांपर्यंत वाढ दिसेल. अहवालात पुढे म्हटले आहे की दर पुनर्रचनेनंतर एकूण राज्ये निव्वळ नफा मिळवतील. ‘एसबीआय रिसर्च’ने जुलै २०१८ आणि ऑक्टोबर २०१९ च्या जीएसटी दर सुधारणांचा अनुभव आपल्या विश्लेषणात समाविष्ट केला आहे. अहवालानुसार दर बदलानंतर सुरुवातीच्या महिन्यांमध्ये तीन ते चार टक्क्यांची तात्पुरती घट दिसून येते; परंतु त्यानंतर, महसुलात सातत्याने दरमहा पाच ते सहा टक्क्यांनी वाढ होते.

अर्थ मंत्रालयाने जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२५ मध्ये जीएसटी संकलन ४.६ टक्क्यांनी वाढून एक लाख ९५ हजार कोटी रुपये झाले. जे गेल्या वर्षी याच महिन्यात एक लाख ८७ हजार कोटी रुपये होते. एप्रिल ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान एकूण करसंकलन नऊ टक्क्यांनी वाढून १३.८९ लाख कोटी रुपये झाले आहे. या कालावधीत केंद्रीय कर संकलन, राज्य कर संकलन आणि एकात्मिक कर संकलनात वाढ झाली आहे, तर उपकर संकलनात किंचित घट झाली आहे. तज्ज्ञांच्या मतानुसार हीच पद्धत कायम राहिल्यास येत्या काही महिन्यांमध्ये सरकारी महसूल आणखी मजबूत होऊ शकतो.

अन्य दखलपात्र आर्थिक घडामोडींमध्ये सणासुदीच्या काळात ऑटोमोबाईल क्षेत्राने वेग घेतल्याचे पहायला मिळाले. ग्राहकांची वाढती मागणी आणि सकारात्मक बाजारभावामुळे महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम), टाटा मोटर्स आणि मारुती सुझुकी यासारख्या आघाडीच्या कंपन्यांच्या विक्रीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या मागणीत वाढ झाल्याने उद्योगात नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांमध्ये ऑटो क्षेत्राच्या कामगिरीबाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत. महिंद्रा अँड महिंद्राची एकूण वाहन विक्री २६ टक्क्यांनी वाढून एक लाख वीस हजार १४२ युनिट्सवर पोहोचली आहे. महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम) ने दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबरमध्ये कंपनीच्या देशांतर्गत प्रवासी वाहनांची विक्री ३१ टक्क्यांनी वाढून ७१,६२४ युनिट्सवर पोहोचली आहे. देशांतर्गत बाजारात व्यावसायिक वाहनांची विक्री १४ टक्क्यांनी वाढून ३१,७४१ युनिट्सवर पोहोचली आहे. दुसरीकडे, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने ऑक्टोबरमध्ये एकूण विक्रीमध्ये ३९ टक्के वाढ नोंदवली. ती ४२,८९२ युनिट्सवर पोहोचली आहे.

कृषी आणि बांधकाम उपकरणे बनवणाऱ्या एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेडने ऑक्टोबर २०२५ मध्ये गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत एकूण ट्रॅक्टरविक्रीमध्ये ३.८ टक्के वाढ नोंदवली असून ती १८ हजार ७९८ युनिट्सवर पोहोचली आहे. ‘स्कोडा ऑटो इंडिया’ने ऑक्टोबर २०२५ मध्ये ८,२५२ युनिट्सची विक्री नोंदवली. ती आतापर्यंतची सर्वाधिक मासिक विक्री आहे. ‘ह्युंदाई मोटर इंडिया’ची विक्री ६९ हजार ८९४ युनिट्सवर पोहोचली आहे. मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडची एकूण विक्री सात टक्क्यांनी वाढून २२०,८९४ युनिट्सवर पोहोचली आहे. व्यावसायिक वाहनांसह त्यांची एकूण देशांतर्गत विक्री एक लाख ८० हजार ६७५ युनिट्सच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे.

‘टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स लिमिटेड’ची एकूण विक्री २६.६ टक्क्यांनी वाढून ६१ हजार २९५ युनिट्सवर पोहोचली आहे. ‘टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स’ने दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबरमध्ये सलग दुसऱ्या महिन्यात विक्रमी ६१ हजार २९५ वाहने विकली गेली. यामध्ये ‘एसयूव्ही’चा सर्वाधिक वाटा होता. ४७ हजारपेक्षा जास्त युनिट्स विकली गेली. ऑक्टोबरमध्ये किया इंडियाची विक्री ३० टक्क्यांनी वाढून २९ हजार ५५६ युनिट्सवर पोहोचली. ‘किआ इंडिया’ची विक्री ३० टक्क्यांनी वाढून २९,५५६ युनिट्सवर पोहोचली. ही भारतीय बाजारात प्रवेश केल्यापासून कंपनीची सर्वोत्तम मासिक विक्री आहे. ‘किआ इंडिया’ने सांगितले, की वाहनांच्या विक्रीमध्ये सोनेटचा सर्वाधिक वाटा होता. या गाडीच्या १२ हजार ७४५ युनिट्सची विक्री झाली. ‘टीव्हीएस मोटर कंपनी’नुसार त्यांची विक्री ११ टक्क्यांनी वाढून पाच लाख ४३ हजार ५५७ युनिट्सवर पोहोचली आहे. गेल्या महिन्यात टीव्हीएसची एकूण दुचाकी विक्री दहा टक्क्यांनी वाढून पाच लाख २५ हजार १५० युनिट्सवर पोहोचली. कंपनीने पुढे म्हटले आहे की देशांतर्गत दुचाकी विक्री आठ टक्क्यांनी वाढून चार लाख २१ हजार ६३१ युनिट्सवर पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्यातील २,३०,८२२ युनिट्सवरून सोळा टक्क्यांनी वाढून ती २,६६,७१५ युनिट्स झाली. गेल्या महिन्यात स्कूटर्सची विक्री सात टक्क्यांनी वाढून २०५,९१९ युनिट्स झाली.

# कोकणचं खरं सौंदर्य झाडा-पानात

राकेश लोहार

कोकणचं खरं वैभव इथल्या झाडा-पानात जास्त खुलून दिसतं. उंच-उंच डोंगर, दऱ्या-खोऱ्यांचा प्रदेश, अथांग समुद्रकिनारे, नारळी-पोफळीच्या बागा, सुरुची बने, हीच खरी कोकणची संपत्ती. कोकणचं वैभव. ते वैभव अबाधित ठेवण्याचे काम सरकारचं आहे. पण, आज त्यावरच ‘विकास’ या गोंडस शब्दाआडून घाला घालण्याचे कटकारस्थान सरकारकडून रचले जात आहे. मात्र, जनता याबाबत अनभिज्ञ आहे. कोकणचा कॅलिफोर्निया करणे राहिले दूरच. इथे तर रोजच्या रोज जंगलेच्या जंगले विकासाच्या नावाखाली तोडली जात आहेत. रस्ते तयार करण्यासाठी जंगले तोडून सिमेंटची जंगले तयार करणार असाल, तर ती काहीच कामाची नाहीत. आज सगळीकडे फक्त रस्ते, रस्ते आणि रस्ते निर्माणासाठी कोट्यवधींच्या घोषणा सरकार करीत सुटले आहे. परंतु, सगळा विकास काय रस्त्यांमुळेच होणार आहे का? सगळंच टक्केवारीचं आर्थिक राजकारण सुरू असल्याची चर्चा होतेय, ती अशा प्रकल्पांमुळेच, यावर सामान्य माणसाने विचार करायला हवाय.

सरकारच्या चुकीच्या धोरणांचा फटका पर्यावरणाच्या मुळावर बसत आहे. आज देशभर नव्हे, तर राज्यभर रस्त्यांचे जाळे विणले जात आहे. परंतु, रस्त्यांची निर्मिती करणे म्हणजे विकास नाही. चौपदरी, सहापदरी रस्ते करुन खरंच विकास साधता येईल का? आज या रस्त्यांमुळे शेतकऱ्यांची किती तरी हेक्टर पिकती शेतजमीन संपादित करुन ती कायमची नष्ट करण्याचे पाप सरकार करीत आहे. एक झाड तोडायला तासभरही वेळ लागणार नाही. मात्र, ते जगवायला-वाढवायला काही दशके वाट पाहावी लागते, याचे गांभीर्य कधी तरी समजून घेणार आहात की नाही. विकासाच्या नावाखाली मनमानी कारभार सुरू आहे. अनेक झाडे गरज नसताना तोडली जात आहे. वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी रस्ता रुंदीकरण हा पर्यायच असू शकत नाही. झाडे तोडून रस्ता मोठा करण्यापेक्षा सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

शेतीसाठी, शहरांच्या वाढीसाठी, कारखान्यांना कच्चा माल पुरवण्यासाठी, इंधनासाठी, खाणींसाठी, रेल्वे आणि रस्त्यांसाठी अशा नानाविध कारणांसाठी आपण जंगलेच्या जंगले, वृक्षांची तोड करीत आहोत. परंतु, त्याच्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष झालेय, ही बाब काही लपून राहिलेली नाही. आज सरकारची विकास या गोंडस संकल्पनेतून या झाडांना नजर लागली असून, रस्त्यावरच्या विकासासाठी त्यांच्यावर कुऱ्हाड चालविली जाणार आहे. पोटच्या पोराप्रमाणे जीवापाड प्रेम करीत, संवर्धन आणि सुरक्षेची काळजी घेतलेल्या झाडांच्या मुळावर सरकारचा विकास भारी पडणार असून, रस्ता रुंदीकरणात असंख्य झाडांची तोड होणार आहे. याबाबत अलिबाग, मुरुड तालुक्यातील शेतकरी, बागायतदारांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

शेकडो झाडे तोडण्याची आवश्यकता असलेल्या आणि विकासाला अनेकदा गरज म्हणून पाहिले जात असले तरी, या प्रकरणामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. रस्त्याच्या रुंदीकरण योजनेत अलिबाग-मुरुड मार्गावरील मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल पुढील काही महिन्यात होणार आहे. केंद्राचा प्रकल्प असल्याने त्याला कोणी विरोध करु शकणार नाही. विरोध करणाऱ्यांवर बळाचा वापर केला जाणार, अशा काही पक्षाच्या बगलबच्च्यांकडून पसरविल्या जात आहेत. जरी केंद्राचा प्रकल्प असला तरी, आज ज्या व्यक्तीची जागा जाणार आहे, ज्यांचे घर-दुकान तोडले जाणार आहे, त्यांना आपल्यापुढे काय वाढून ठेवलेय त्याची साधी कल्पनासुद्धा नाही. असला विकास काय कामाचा? सगळीकडे वाट लावून रस्ते बांधून सरकार काय साध्य करु इच्छिते? ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, ते रस्ते आधी करा ना!

अलिबाग, मुरुड शहरांना ऐतिहासिक वारसा लाभला हे जरी खरे असले, तरी या दोन्ही शहरांचे खरे सौंदर्य येथील नारळी-पोफळीच्या बागांमध्ये, रस्त्याच्या दुतर्फा पसरलेल्या घनदाट जंगलांमध्ये आहे. ते अबाधित ठेवण्याचे काम येथील जनतेने केले आहे. परंतु, आज हीच जनता सरकारच्या विकासामुळे चिंताग्रस्त आहे. कारण, रस्त्यांच्या नावाखाली सौंदर्यात भर घालणारी सर्वच झाडे आता तोडली जाणार आहेत. झाडांच्या सुरक्षेसाठी योग्य ती पावलं उचलणे आवश्यक आहे. निसर्ग वाचविण्यासाठीच स्थानिक नागरिकांची धडपड वाखाणण्याजोगी आहे. शेवटी सत्य एकच आहे, ते म्हणजे निसर्ग टिकला तरच माणूस टिकणार आहे. परंतु, सरकारचे काम त्याच्या विरोधात नाही का?

रेवस-रेड्डी महामार्ग हा मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय म्हणून दुसरा मार्ग काढण्यात येत असल्याच्या बोंबा आहेत. परंतु, हा मार्ग तयार करण्याआधी सतरा वर्षे रखडलेला मुंबई-गोवा महामार्ग आधी व्यवस्थितरित्या पूर्ण करावा, अशी मागणी तमाम कोकणवासियांची आहे. त्याकडे दुर्लक्ष करुन सरकार रेवस-रेड्डी मार्ग तयार करुन काय साध्य करणार आहे? हा पर्याय काय कामाचा!

लोकसंसद

## गोड साखरेची कडू कहाणी भारत सरकारने कायमची संपवावी

आपला भारत देश कृषीप्रधान म्हणून जगामध्ये ओळखला जातो भारत स्वतंत्र झाल्यानंतर जय जवान जय किसानचा नारा देण्यात आला मात्र आज भारत स्वतंत्र होवून अष्टयात्तर वर्षे लोटली तरी आजही शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनांला हमीभाव मिळेनासा झाला आहे राजकारणामध्ये माहिर असलेले पुढारी नुसत्या बढाया मारतात प्रत्यक्षात काहिच नाही आज महाराष्ट्रासह कर्नाटकात ऊस दरासाठी विविध शेतकरी संघटनेतर्फे आंदोलने छेडली जात आहेत महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी यंदा ३७५१/- रुपये दर मिळावा म्हणून रणशिंग फुंकले तर कर्नाटक राज्य रयत संघटनेकडून ३५००/- मागणी करण्यात आली कमी रिकव्हरी दाखवून शेतकऱ्यांना कारखानदार लुटतं आहेत एका टनापासून १४ ते १५ हजार कारखानदारांना मिळतात पण शेतकरी रात्रंदिवस, ऊन, थंडी, पाऊस, वारा वेळप्रसंगी हिंस्त्र प्राण्यांची तमा न बाळगता काबाड कष्ट करुन ऊसाचे उत्पादन घेतो मात्र शेतकऱ्यांना ऊस दरासाठी झगडावे लागते साखर सम्राटांच्या दारात उभे रहावे लागते हि लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल हे कुठेतरी थांबले पाहिजे यंदा ऊस दराची कोंडी राजू शेट्टी यांच्या होम पिचवरील शिरोळच्या दत्त कारखान्याने रुपये ३५००/- दर जाहिर करुन ऊस दराची कोंडी फोडली तर कर्नाटकात ३३००/- दर शेतकरी संघटनेला मान्य झाला आहे त्यामूळे शतप्रतिशत संघटनेला यश आले असले तरी अजुनही काही कारखाने दर देण्यास टाळाटाळ करत आहेत त्यामूळे आगामी काळात संघटनेची भूमिका काय राहते ते पहावे लागेल पण या नियमावलीतील कारखान्यांच्या धूराडी पेटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे यंदा महाराष्ट्रापेक्षा कर्नाटकातील शेतकरी संघटनांनी आंदोलनाची उचल खाल्ली होती हत्तरगी टोल नाक्यावरील महामार्ग रोको आंदोलन लक्षवेधी ठरले मागील काही दिवसांपासून सीमाभागासह गुर्लापूरपर्यंत आंदोलने झाली याला विविध संघटनांनी पाठिंबा दर्शविला होता काही ठिकाणी महिलांनीसुद्धा आंदोलनात उडी घेतली होती शेतकऱ्यांना ऊस दरासाठी दरवर्षी झगडावे लागते तसे होवू नये, गोड साखरेची कडू कहाणी कायमची संपवायची असेल तर भारत सरकारने दीर्घकाळीन तोडगा काढणे कधीही हिताचे ठरणारं आहे !

**राजू जाधव, मांगूर**

दिनविशेष

# शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन

२००२ पासून दरवर्षी, १० नोव्हेंबर रोजी शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन साजरा केला जातो. हा दिवस समाजाची जडणघडण अबाधित ठेवण्यासाठी आणि भरभराटीसाठी विज्ञानाच्या महत्त्वाला समर्पित केला आहे. उजतखऊ-१९ साथीच्या रोगाने जगाला अशा गोष्टींची जाणीव करून दिली ज्या मानवजातीच्या अस्तित्वासाठी खरोखर महत्त्वाच्या आहेत. यात समाजाच्या चांगल्या कार्यासाठी एकमेकांना मदत करण्याचे महत्त्व लोकांना कळले. त्याचे महत्त्व प्रस्थापित करणारा आणखी एक पैलू म्हणजे विज्ञान. समाजात विज्ञानाच्या अस्तित्वाविषयी अनभिज्ञ असणे जवळजवळ अशक्य असले तरी, आपल्या दैनंदिन जीवनात विज्ञानाचे महत्त्व साथीच्या रोगात पुन्हा टवटवीत झाले. १९९९ मध्ये बुडापेस्टमध्ये विज्ञान विषयावरील जागतिक परिषदेत सुरू करण्यात आली होती. दरम्यान या परिषदेने मानसिकतेची बीजे पेरली, बांधिलकीची संकल्पना दृढ करणारी संघटना अधिक विज्ञान, त्याचे उपयोग आणि त्याची कारणे याविषयी समाजात सकारात्मकता निर्माण केली. मानवतावादी आणि भौतिकवादी ध्येये साध्य करण्यासाठी वैज्ञानिक ज्ञानाचा वापर प्रसिद्धीच्या झोतात आणला गेला. जागतिक विज्ञान दिन २००१ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने (युनेस्को) जाहीर केले आणि २००२ मध्ये प्रथमच ते साजरे केले. विज्ञानाला समाजाशी अधिक जवळून जोडण्याद्वारे, जागतिक विज्ञान दिन नागरिकांना विज्ञानातील घडामोडींविषयी माहिती पुरविली पाहिजे हे सुनिश्चित केले. त्यात सर्व प्रकारच्या संस्था आणि व्यवसायातील सहभागींचा समावेश करण्यात आला. विज्ञानाला अधिक समाजाभिमुख करण्यासाठी ८२१६;जागतिक विज्ञान दिवस सामान्य माणसाला वैज्ञानिक शोधांबद्दल जागृत करते. सामान्यांना वैज्ञानिक शोधांची माहिती मिळावी त्याचा उपयोग दैनंदिन जीवनात कसा करता येईल याबद्दल अधिक माहिती या दिवशी दिली जाते. शाश्वत विकास आणि पृथ्वीवरील सजीवसृष्टी अधिक समजून घेण्याचा प्रयत्न याद्वारे केला जातो. या दिवशी जगभरात विविध चर्चासत्रे, परिषद, प्रदर्शने, अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विज्ञानाचा शांतता आणि विकासाबद्दलचा जनमानसातील दृष्टिकोन अधिक प्रगल्भ करणे. विविध देशांमध्ये वैज्ञानिक संशिधानाची देवाणघेवाण करणे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विज्ञान समित्यांची अथवा व्यासपीठांची स्थापना करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे. येणाऱ्या समस्यांकडे वैज्ञानिक जगताचे लक्ष वेधने. दोन दशकांच्या उत्सवातून, जागतिक शांतता आणि विकासासाठी विज्ञान दिन हा एक महत्त्वाचा कार्यक्रम बनला आहे, जो केवळ विज्ञानाच्या भूमिकेबद्दल जागरूकता निर्माण करत नाही तर ठोस प्रकल्प आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यातही योगदान देतो . जागतिक विज्ञान दिनापासून प्रेरित प्रकल्प शांतता प्रस्थापित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत, जसे की संघर्षग्रस्त प्रदेशांमधील शास्त्रज्ञांमधील सहकार्य आणि विकसनशील देशांमध्ये विज्ञान कार्यक्रमांसाठी निधी वाढवणे. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे विज्ञानाचे मानवजातीच्या शांती आणि विकासासाठी असलेले योगदान अधोरेखित करणे, तसेच विज्ञानविषयक जनजागृती निर्माण करणे होय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगात अनेक समस्या सोडवता आल्या आहेत, ज्यामध्ये पर्यावरणीय समस्या, आरोग्यविषयक समस्या, आणि ऊर्जा बचत यांचा समावेश होतो. जागतिक विज्ञान दिनाने शांतता आणि विकासावरील चर्चेच्या केंद्रस्थानी विज्ञानाला स्थान देण्यात यश मिळवले आहे, वैज्ञानिक प्रगती सामाजिक प्रगती, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षणात कशी योगदान देते यावर प्रकाश टाकला आहे. यादिवशी शाळा, महाविद्यालये, आणि शैक्षणिक संस्था विज्ञानविषयक कार्यशाळा, प्रदर्शनं, आणि चर्चासत्रांचे आयोजन करतात, ज्यातून विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व समजते आणि त्यांची संशोधनविषयक आवड वाढते. विज्ञानाचा शांतीसाठी उपयोग कसा करता येईल आणि संशोधनाचा विकासासाठी कसा फायदा होईल यावर या दिवशी विशेष भर दिला जातो. जागतिक विज्ञान दिन आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोनातून समस्या सोडवण्यास प्रेरणा देतो आणि शाश्वत विकासासाठी विज्ञानाचा वापर कसा करावा हे शिकवतो, ज्यामुळे एक समृद्ध आणि सुरक्षित भवितव्य घडू शकते.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० नोव्हेंबर

१) श्री.दत्तात्रेय जवरू पाटील मु.कुरूळ, अलिबाग, १०-११-१९४२

२)श्री.सुरेश सदाशिव पाटील मु.धामणपाडा, अलिबाग १०-११-१९४४

३)श्रीम.उषा शरद रानवडे चेंढरे-अलिबाग १०-११-१९४४

४)श्रीम.प्रतिभा आनंद खडपकर चेंढरे-अलिबाग १०-११-१९५४

# गोरगरिबांचा घास काळाबाजारात

## • शहापुरात शेकडो क्विंटल धान्याचा साठा जप्त

**| ठाणे | प्रतिनिधी |**

गोरगरिबांच्या तोंडचा घास हिरावून रेशनिंगवरील धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांचा डाव शहापूर पोलिसांनी उधळला आहे. शहरात पेट्रोलिंग सुरू असताना एका खासगी गोडाऊनबाहेर उभ्या असलेल्या ट्रकची झाडाझडती घेतली असता त्यात शेकडो क्विंटल तांदूळ व गहू आढळून आला. याबाबत पोलिसांनी माहिती देताच त्याची गंभीर दखल घेत तहसीलदार व पुरवठा अधिकाऱ्यांनी घटनास्थळावर धाव घेत ट्रकसह लाखो रुपये किमतीचे धान्य जप्त केले आहे. त्यामुळे रास्त धान्य दुकानातील तांदूळ व गव्हाचा काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.



क्विंटल तांदूळ व पाच क्विंटल गहू असा १६५ क्विंटल धान्य साठा होता. हे धान्य भिवंडी येथील शासकीय गोदमातून शहापूर तालुक्यातील अघई येथील रेशन दुकानात जाणार होते, अशी माहिती शहापूर तहसील दार परमेश्वर कासुळे व पुरवठा अधिकारी अमृता सूर्यवंशी यांनी दिली. मात्र ट्रकचालकाने धान्याने भरलेला ट्रक अघई येथील रेशन दुकानात जाण्याऐवजी शहापुरातील अर्चना इंग्लिश मिडीयम स्कूलसमोर असलेल्या एक खाजगी गोडाऊनलगत उभा केला. शहापूर पोलिसांना याबाबत संशय आल्याने पोलिसांनी ट्रकचालकाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. याबाबत तालुका पुरवठा अधिकाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर धान्याचा काळाबाजार करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी ट्रकचालक एजाज शहा याला अटक केली आहे.

### मोठी टोळी असण्याचा संशय

जप्त केलेल्या ट्रकमध्ये ५० क्विंटल तांदळाच्या ३२० तर गव्हाच्या १० गोणी असे १६५ क्विंटल धान्य होते. याबाबत पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांनी तहसील दार परमेश्वर कासुळे व पुरवठा निरीक्षकांना माहिती दिली. याप्रकरणी ट्रकचालक एजाज शहा याला अटक केली असून त्याच्या चौकशीतून अधिक माहिती मिळणार आहे. या रॅकेटमध्ये मोठी टोळी सहभागी असण्याचा संशय पोलिसांना आहे.

### वाहतूक ठेकेदाराची चौकशी करा

शहापूरच्या गोदामातून शहापूर तालुक्यातील रेशन दुकानदारांना धान्याचा पुरवठा होणे क्रमप्राप्त आहे. मात्र भिवंडी येथून थेट शहापूरच्या रेशन दुकानात तब्बल १६५ क्विंटल धान्य पाठवण्यात आल्याने यामागे काही काळेबेरे असण्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी वाहतूक ठेकेदाराबरोबरच अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी होऊ लागली आहे.

## होंडा शोरूमला भीषण आग

**| मुंबई | प्रतिनिधी।**

अंधेरी येथील चांदिवली फार्म मार्गावरील कमानी ऑईल गेटमागच्या होंडा शोरुमला शनिवारी (दि.८) मध्यरात्री १.३० च्या सुमारास अचानक आग लागली. ही आग एवढी भीषण होती की, या आगीत शोरुमचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शनिवारी रात्री शोरुममधून काम आटोपून कर्मचारी आपापल्या घरी परतले होते. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, दुर्घटनास्थळी जवळपास पाच तास अग्नितांडव सुरू होते. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर त्यांनी मदतकार्य हाती घेतले. आगीमुळे आसपासच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीही झाली होती. प्रयत्नांची पराकाष्ठा करून रविवारी सकाळी ६.१२ च्या सुमारास आग विझवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. सद्यस्थितीत घटनास्थळी अग्निशमन दलाचे कुलिंग ऑपरेशन सुरू करण्यात आले. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# बोगदा खोदून ज्वेलर्सवर दरोडा

## • सुरक्षा रक्षकानेच चोरी केल्याचा व्यापाऱ्यांना संशय

**| पालघर | प्रतिनिधी |**

पालघर शहरातील मुख्य भाजी बाजारात असलेल्या एका प्रसिद्ध सराफा दुकानात शेजारच्या दुकानातून बोगदा (सुरंग) करून प्रवेश करत चोरट्याने लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने लुटून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, घटनेनंतर इमारतीतील सुरक्षा रक्षकही गायब असून, सुरक्षा रक्षकानेच हा प्रकार केल्याचा प्राथमिक संशय येथील व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

पालघर शहरातील मुख्य भाजी बाजारातील अंबर शॉपिंग मॉल येथे कपड्यांसह ज्वेलर्सची अनेक दुकाने आहेत. याच मॉलमध्ये



असलेल्या नाकोडा ज्वेलर्स या दुकानाला चोरट्याने लक्ष्य केले. ही घटना काल मध्यरात्री १२ ते पहाटे ४ वाजेच्या दरम्यान घडली असावी, असा अंदाज आहे. चोरट्याने ज्वेलर्सच्या शेजारी असलेल्या कपड्याच्या दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपड्याच्या दुकानातून बोगदा (सुरंग) तयार करून ज्वेलर्सच्या दुकानात प्रवेश केला. ज्वेलर्सच्या दुकानातील तिजोरी कापून त्यामध्ये ठेवलेले लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने घेऊन चोरटा फरार झाला.

चोरी झालेल्या इमारतीमध्ये असलेला सुरक्षा रक्षक देखील या घटनेनंतर गायब झाला आहे. यामुळे हा प्रकार सुरक्षा रक्षकानेच केल्याचा प्राथमिक अंदाज येथील व्यापाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. दुकानावर लावलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे वायर देखील चोरट्याने कापल्याचे सांगण्यात येत आहे. या चोरीबाबत पहाटे पालघर पोलीस ठाण्यात कळविण्यात आले.

### व्यापाऱ्यांच्या मनात भीतीचे वातावरण

या भागात मोठ्या प्रमाणात सराफाची दुकाने असल्यामुळे या घटनेमुळे इतर दुकानदारांच्या मनातही भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेनंतर अनेक दुकानदारांनी आपल्या दुकानांवर नवीन सीसीटीव्ही कॅमेरे लावून घेण्यास सुरुवात केली आहे. तसेच, सध्या कार्यरत असलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरक्षित आहेत की नाहीत, याची तपासणीही इतर दुकानदार करत आहेत.

माहिती मिळताच पालघर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाच्या ठिकाणावरून बोटांचे ठसे आणि इतर पुरावे शोधण्याचे काम सुरू केले आहे.



## माकडांच्या उपद्रवावर अखेर तोडगा

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

आरे गावातील वाढत्या माकड उपद्रवामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांना अखेर दिलासा मिळाला आहे. माड, पेरू, भात शेती आणि घरांची हानी करणाऱ्या माकडांच्या पकडीसाठी फॉरेस्ट विभागाने पिंजरे बसविण्याची कारवाई सुरू केली. ही कारवाई माजी पंचायत समिती सदस्य अजित कांबळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शक्य झाली. या उपक्रमामुळे गावातील ग्रमस्थांना दिलासा मिळाला आहे.

# ओल्या जमिनीवर कडधान्य पिके घ्यावीत

## • मंडल कृषी अधिकारी मनोज गांधी यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

तालुक्यातील अनेक भागांमध्ये भात कापणीच्या काळातच झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या भात पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाताच्या लोंबीतील दाण्यालाच रुजवा आला असून, दाणा झोडून घेतला तरी भरलेला व दर्जेदार भात मिळणे कठीण झाले आहे. या अनपेक्षित परिस्थितीने शेतकऱ्यांचे मनोबल खचले असले, तरी हीच वेळ पुढील वाटचाल ठरविण्याची असल्याचे मत मंडळ कृषी अधिकारी मनोज गांधी यांनी व्यक्त केले आहे.

मनोज गांधी यांनी सांगितले की, शासनाकडून नुकसानभरपाई मिळेलच; मात्र तिची वाट पाहत बसण्याऐवजी पडलेल्या ओलीताचा योग्य फायदा घेऊन कमी कालावधीची कडधान्य पिके घेणे गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात उत्पन्न मिळेलच, शिवाय जमिनीचा कस सुधारेल आणि पुढील खरीप हंगामासाठी जमीन अधिक सुपीक बनेल. भात कापणीनंतर ओलीत जमिनीवर मूग, कुळीथ, पावटा आणि चवळी ही पिके घेता येतात. मूग पीक ७५ ते ८० दिवसांत येणारे, ओल्या जमिनीत उत्तम उगवणारे पीक आहे. कुळीथ अतिशय सहनशील, कमी खर्चिक व जमिनीचा कस राखणारे आहे. चवळी पीक कमी ओलावा, कमी वेळ आणि उच्च पोषणमूल्य असलेले पीक आहे. पावटा हा शेंगवर्गीय असून, स्थानिक बाजारात चांगली मागणी असणारे पीक आहे. बियाण्यांवर रायझोबियम व फॉस्फेट सॉल्व्हलाईझिंग बॅक्टेरिया उपचार केल्यास पिकांची वाढ अधिक चांगली होते, असेही गांधी यांनी सांगितले.

पाऊस आपल्याला थांबवू शकत नाही. आज पीक गेले तरी उद्याचे शेत पुन्हा फुलणार आहे. फक्त आपण न थांबता नवीन दिशा घेतली पाहिजे, असा प्रेरणादायी संदेश मनोज गांधी यांनी दिला.

## रेल्वे स्थानकात जागरूकता मोहीम

**चिपळूण :** अनेक रेल्वे गाड्यांचे दरवाजे आतून बंद करून ठेवले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे चिपळूण स्थानकावर आरक्षण असलेल्या प्रवाशांनादेखील आत प्रवेश करता येत नाही. या प्रकाराकडे कोकण रेल्वे अन्याय निवारण समितीचे अध्यक्ष शौकत मुकादम यांनी लक्ष वेधले असून, दरवाजे आतून बंद करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली होती. या पार्श्वभूमीवर रेल्वे सुरक्षा दल आता ॲक्शन मोडमध्ये आले असून चिपळूण रेल्वे स्थानकावर विशेष जागरूकता मोहीम राबविण्यात आली.

# समुद्रातील डिझेल चोरीचा पर्दाफाश

- कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त
- दहा जणांना अटक

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भाऊचा धक्कापासून ८०० मीटर खोल समुद्रात डिझेल चोरीचा प्रकार येलोगेट पोलिसांनी उधळून लावला. दोन मोठ्या बार्जमध्ये भरून १० हजार लिटर डिझेल पोलिसांनी पकडले. याप्रकरणी १० जणांना अटक करून चार कोटी ५९ लाख १५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

भाऊचा धक्क्यापासून ८०० मीटर खोल समुद्रात श्री अनंत लक्ष्मी, पीएनो ४३० तसेच एम.टी. प्रणय, बीडीआर या दोन बार्जमध्ये मोठ्या प्रमाणात चोरीचे डिझेल असल्याची माहिती येलोगेट पोलिसांना मिळाली. त्यानुसार उपायुक्त विजयकांत सागर यांच्या मार्गदर्शनाखाली येलोगेट पोलिसांनी तेथे धडक देऊन दोन्ही बार्ज ताब्यात घेतले. श्री अनंत लक्ष्मी बार्जमध्ये ८ लाख ७३ हजार किमतीचे ९७०० लिटर डिझेल मिळून आले, तर त्या शेजारीच असलेल्या एम.टी. प्रणय बार्जमध्ये २७ हजार किमतीचे ३०० लिटर डिझेल सापडले. या दोन्ही बार्जमधील सदर डिझेल चोरीचे असून ते विकत घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे गुन्हा नोंदवून पोलिसांनी यासीन मुजावर, रामराज सिंग, कमलेश दीक्षित, दीपक कुमार सिंग, लोकेशकुमार सैनी, राजन कुमार यादव, प्रदीप कुमार वैद्य, गोपाल कुवर, नेत्रा कुवर, दिपेंद्र कुवर या १० जणांना अटक केली.

# कोकण रेल्वेच्या 'रो-रो'ची वहनक्षमता वाढली

## अवजड वाहतूकदारांना होणार फायदा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

कोकण रेल्वेच्या 'रोल-ऑन रोल-ऑफ' (रो-रो) सेवेला नवीन झेप मिळाली आहे. मालवाहतुकीची कार्यक्षमता वाढवण्यासाठी कोकण रेल्वे प्रशासनाने या सेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या वॅगनची वहनक्षमता ५० टनांवरून ५७ टनांपर्यंत वाढवली आहे.

१९९९ मध्ये सुरू झालेली 'रो-रो' सेवा ही कोकण रेल्वेची एक आगळीवेगळी आणि किफायतशीर वाहतूक योजना आहे. या सेवेअंतर्गत मालवाहू ट्रक थेट रेल्वे वॅगनवर चढवून नेले जातात. त्यामुळे इंधन बचत, चालकांचा थकवा, रस्त्यांवरील गर्दी आणि प्रदूषण यामध्ये मोठी घट होते. नवीन क्षमतेनुसार एका 'रो-रो' रेकमध्ये एकूण ५० वॅगन असतील. त्यापैकी १५ बीआरएन वॅगन प्रत्येकी ५७ टन वजनाचे ट्रक वाहून नेऊ शकतील, तर उर्वरित ३५ बॉक्सएन वॅगन प्रत्येकी ५० टनांपर्यंतचे ट्रक वाहून नेण्यासाठी सक्षम असतील. ५७ टन क्षमतेच्या नव्या वॅगनसह पहिली 'रो-रो' सेवा बुधवार (दि.५)पासून सुरू करण्यात आली आहे.

जड वाहन वाहतुकीत वाढरो-रो सेवेच्या क्षमता वाढीमुळे जड व्यावसायिक वाहनांच्या वाहतुकीस अधिक लवचिकता मिळणार आहे. विशेषतः लोखंड-स्टील, टाइल्स, मार्बल, बांधकाम साहित्य आणि इतर जड मालवाहतूक करणाऱ्या उद्योगांना या सुधारणेचा मोठा फायदा होणार आहे. ५० टनांपेक्षा जास्त वजनाचे ट्रक वाहतूक करू इच्छिणाऱ्या ट्रकचालकांनी कोलाड (९००४४७६०९०) किंवा सुरथकल (९६८६६५६१५९) येथील आरक्षण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे कोकण रेल्वेकडून आवाहन करण्यात आले आहे.

# एसटी महामंडळ सातत्याने तोट्यातच

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्य परिवहन (एसटी) महामंडळाला दिवाळीच्या हंगामात अतिरिक्त उत्पन्न कमवता आले नाही. दैनंदिन वाहतूक अहवालानुसार, प्रतिदिन सवलतमूल्य रकमेसह प्रवासी तिकिटांमधून मिळणाऱ्या महसुलात तब्बल ६ कोटी रुपयांची तूट आली असून, ऑक्टोबर महिन्यात सुमारे १८० कोटी रुपयांचा फटका बसल्याची माहिती मिळाली आहे.

एसटी महामंडळ 'ना नफा ना तोटा' या तत्वावर धावते. परंतु, प्रत्यक्षात एसटी महामंडळ सातत्याने तोट्यातच आहे. दर महिन्याला आर्थिक टंचाई भासत असल्याने एसटी कर्मचाऱ्यांना दरमहा वेतन देणे महामंडळाला कठीण होत आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून सवलतमूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी मिळणाऱ्या निधीवर अवलंबून राहावे लागते. या वर्षी झालेल्या १४.९५ टक्के भाडेवाढीचा विचार करता प्रतिदिन सुमारे सरासरी ३३ कोटी रुपये उत्पन्न मिळायला हवे होते. परंतु

### निष्क्रिय अधिकाऱ्यांची तातडीने बदली करावी

एसटी महामंडळाचा संचित तोटा ११ हजार कोटी रुपयांच्या घरात पोहोचला असून, दरवर्षी तोटा वाढत आहे. तिकीट विक्रीत घट का होते याचा अभ्यास करण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांचा स्वतंत्र गट तातडीने नेमायला हवा. वर्षानुवर्षे एकाच पदावर असलेल्या निष्क्रिय अधिकाऱ्यांची तातडीने बदली करावी. आवश्यकता भासल्यास त्यांच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाई करावी, असे मत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केले.

**नवी मुंबई महापालिकेचा निर्णय** | **५९ विकासकांना बजावल्या नोटीसा**

# प्रदूषण करणारी बांधकामे रोखणार

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वायू, ध्वनी प्रदूषण आणि ब्लास्टींग करणाऱ्या विकासकांनी दिलेल्या नोटीशीनुसार त्वरित उपाययोजना न केल्यास त्यांच्या बांधकामांना स्थगिती आदेश देण्यात येतील, असा निर्णय नवी मुंबई महापालिकेने घेतला आहे. दोषी ५९ विकासकांना मागील महिन्यात नोटीसा बजावण्यात आल्याचे अचिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.

उच्च न्यायालयाचे आदेश आणि बांधकामांच्या ठिकाणी होत असलेले ध्वनी आणि वायू प्रदूषण याबाबत नागरिकांकडून होत असलेल्या तक्रारी विचारात घेता त्यावर कायम स्वरुपी तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व मान्यतेने 'मानक कार्यप्रणाली तयार करुन १ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या मानक कार्यप्रणालीची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अंतर्भूत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे. परंतु नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये काही बांधकामाच्या ठिकाणी सुरू असलेल्या कामांमध्ये होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदूषणाबाबतच्या



मानक प्रणालीची पूर्तता होत नसल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने १२ ऑक्टोबर २०२५ रोजी या सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रत्यक्ष जागेची पहाणी करुन सदर मानक प्रणालीचे उल्लघंन होत असलेल्या एकूण ५९ विकासकांना २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सदर मानक प्रणालीची पूर्तता करण्याबाबत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. याबाबत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार नगररचना विभागामार्फत सहायक संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच विकासक व वास्तुविशारद यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये सहायक संचालक नगररचना यांनी सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी संरक्षक कुंपण बांधणे, बांधकाम साहित्य व राडा-रोडा साहित्य नेआण करणाऱ्या वाहनांच्या चाकांची स्वच्छता करणे, पदपथ मोकळे व स्वच्छ ठेवणे, ठरवून दिलेल्या विहित वेळेत काम पूर्ण करणे, फॉगर्स लावणे, स्प्रिंकलर बसविणे, सीसीटिव्ही कॅमेरे बसविणे इ. बाबींची पूर्तता करणेबाबत सर्व विकासक, वास्तुविशारद व त्यांच्या प्रतिनिधींना माहिती देण्यात आली.

ज्या विकासकांकडून मानक कार्यप्रणालीचे उल्लंघन होईल अशा विकासकांना दंड आकारण्यात येईल तसेच, समाधान न झाल्यास पर्यायाने 'मानक कार्यप्रणालीचे उल्लंघन करणाऱ्या विकासकांच्या कामांना स्थगिती आदेश देण्याची कठोर कार्यवाही करण्यात येईल असे सहायक संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांनी सूचित केले आहे.

## निवडक



### शाळांना स्वमालकीच्या इमारतींची प्रतीक्षा

**राजापूर :** शाळांमध्ये दर्जेदार भौतिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. मात्र, आजही स्वमालकीच्या इमारतीअभावी तालुक्यातील तब्बल २२ शाळा गेल्या १० वर्षाहून अधिक कालावधीपासून भाड्याच्या जागांमध्ये भरवल्या जात आहेत. ज्या इमारतींमध्ये या शाळा भाडेतत्वावर भरत आहेत, त्या ६३ वर्गखोल्यांच्या जागांचे भाडे देण्यासाठी दरमहा तब्बल ३० ते ३५ हजार रुपये खर्च केले जात आहेत. शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या शासनाकडून शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून कोट्यवधीचा निधी खर्च केला जातो. शाळांमध्ये सुंदर इमारत बांधण्यासाठी यासाठी शासनातर्फे सर्व शिक्षा अभियानांतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. त्यातून चांगल्या दर्जेदार इमारती बाधल्या जात आहेत. मात्र, आजही स्वमालकीच्या इमारतींची प्रतीक्षा राहिली आहे. त्यामध्ये पहिली ते सातवीपर्यंत १३ तर पहिली ते चौथीपर्यंत ८ शाळांचा समावेश आहे. या शाळा ६३ खोल्यांमध्ये आजही भाड्याच्या इमारतीमध्ये भरत आहेत. यासाठी शासनाकडून दरमहा ३० ते ३५ हजार रुपये खर्च केले जात आहेत. यामध्ये ५० रुपयापासून १२ हजार रुपयांपर्यंतच्या भाड्याचा समावेश आहे.

### कुत्र्याच्या हल्ल्यात चिमुकली जखमी



**ठाणे :** भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात दोन वर्षांची चिमुकली गंभीर जखमी झाल्याची घटना दिव्यातील विकास म्हात्रे गेट परिसरात घडली आहे. वेदा काजारे असे या चिमुकलीचे नाव आहे. ती भावासोबत रस्त्याने चालत असताना मागून आलेल्या भटक्या कुत्र्याने तिचे लचके तोडले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पालिकेच्या निर्बीजीकरण मोहिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे. केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कुत्र्यांचा सुळसुळाट वाढल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वेदा सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास भावासोबत खेळण्यासाठी इमारतीच्या खाली उतरली होती. त्याच वेळी मागून आलेल्या भटक्या कुत्र्याने तिच्या पाठीचा जोरदार चावा घेतला. ती खाली कोसळली आणि त्या कुत्र्याने तिचे लचके तोडण्यास सुरुवात केली. या हल्ल्यात वेदाच्या पाठीला, छातीला आणि कमरेला गंभीर दुखापत झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कुत्र्याने केलेला हल्ला सीसीटीव्हीत कैद झाला आहे.


### मानव संसाधन, ऑपरेशन्सवर कार्यशाळा



**नवी मुंबई :** भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, नवी मुंबई आणि इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट (), नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने टेक्नॉलॉजी एनेबल्ड ह्युमन रिसोर्सेस आणि ऑपरेशन्स या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेच्या संचालिका डॉ. अंजली कळसे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगातील वेगाने बदलणाऱ्या तांत्रिक प्रवाहाशी जुळवून घेण्याचा सल्ला देत या उपक्रमाचे कौतुक केले. मुख्य वक्ते म्हणून उपस्थित असलेल्या युवराज ठोंबरे, व्हाइस प्रेसिडेंट, ओनामा ग्रुप, मुंबई व संस्थेचे माजी विद्यार्थी, यांनी तंत्रज्ञानाधारित उद्योगव्यवस्था, आधुनिक HR आणि ऑपरेशन्स प्रॅक्टिसेस तसेच एसएपी क्षेत्रातील करिअर संधी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरेही त्यांनी दिली. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना उद्योगजगताच्या प्रत्यक्ष गरजा समजून देणारी आणि तंत्रज्ञानावर आधारित करिअरच्या नव्या संधींना दिशा देणारी ठरली.

### अपहरणाचा 'फिल्मी बनाव' फसला

**सिंधुदुर्ग :** भाड्याच्या पैशांवरून सुरू झालेला वाद अखेर 'अपहरण आणि मारहाण' या बनावट प्रकरणापर्यंत पोहोचला होता. परंतु, पोलिसांनी सखोल तपास करून या कथानकाचा खरा चेहरा उघड केला आहे. सिद्धेश गावडे या युवकाने स्वतःचे अपहरण आणि मारहाण झाल्याची खोटी फिर्याद दाखल करून 'फिल्मी ड्रामा' रचला होता, मात्र पोलिसांच्या तपासात हा सगळा प्रकार बनाव असल्याचे समोर आले आहे. युवकाने कुडाळमधील एका फ्लॅटचे भाडे न भरल्यामुळे ॲड. किशोर वरक यांनी विचारणा केली. याचा राग मनात धरून त्याने हे नाट्य रचले. त्याने पोलिसांत तक्रार देऊन ॲड. वरक आणि त्यांच्या दोन साथीदारांवर गुन्हा दाखल करून त्यांना अडकवण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, बांदा आणि निवती पोलिसांच्या चौकशीत हे सत्य बाहेर आले. सिद्धेश गावडे याची ही पूर्णपणे खोटी आणि बनाव असल्याचे निष्पन्न झाले.



### पाणीपुरवठा बारा तास बंद राहणार

**कल्याण :** कल्याण, टिटवाळा शहरांचा पाणी पुरवठा येत्या मंगळवारी (दि.११) बारा तास बंद ठेवण्याचा निर्णय कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने घेतला आहे. या कालावधीत पाणीपुरवठा यंत्रणेतील देखभाल दुरुस्तीची कामे सकाळी नऊ ते रात्री नऊ वेळेत केली जाणार आहेत. कल्याण, टिटवाळा शहर परिसराला उल्हास नदी काठच्या मोहिली येथील गाव हद्दीतील मोहिली जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो. या जलशुध्दीकरण केंद्राच्या यांत्रिक आणि तांत्रिक देखभाल दुरुस्तीचे काम येत्या मंगळवारी केली जाणार आहेत. मोहिली जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या कल्याण शहरातील पूर्वेतील वालधुनी परिसर, कल्याण पश्चिमेतील बिर्ला महाविद्यालय परिसर, उपप्रादेशिक परिवहन विभाग परिसर, टिटवाळा अ प्रभाग क्षेत्रातील मांडा, टिटवाळा, मोहने, आंबिवली, धाकटे शहाड, शहाड, बंदरपाडा, वडवली परिसराचा पाणी पुरवठा मंगळवारी बंद राहणार आहे.

# प्रिय आई.....
## श्रीमती मालती मधुकर ठाकूर

आज आनंदाचा दिवस. आई तुझ्या वयाची पंचाहत्तरी साजरी करताना आम्हा सर्व मुलांना खूप म्हणजे खूप आनंद होत आहे. खरंतर पप्पांची पंचाहत्तरी साजरी करायची मनापासूनची इच्छा होती. पण ते आमच्या नशिबात नव्हते; मात्र आज तुझा पंचाहत्तरावा वाढदिवस साजरा करताना आम्हा सर्व कुटुंबियांना मनापासून आनंद होत आहे. आज आम्ही जे दिवस बघतोय त्यांचे सर्व श्रेय तुझ्या आणि पप्पांच्या मेहनतीला जाते. तुझ्याबद्दल लिहिण्यासारखे भरपूर काही आहे. अनेक प्रसंग यावेळी मनात दाटून येत आहेत. पण निश्चित अपुरे पडतील.



स्व. अनंत श्रीभाऊ नाईक आणि सुलोचना अनंत नाईक (राहणार म्हात्रोळी, तालुका अलिबाग) यांच्या पोटी तुझा जन्म झाला. घरातील तू मोठी होतीस. अशोक, गणेश ही तुझी लहान भावंडे. आजपासून सुमारे ५७ ते ५८ वर्षापूर्वी तुझा पप्पांसोबत प्रेमविवाह झाला. तसा त्याकाळी विरोधही झाला, परंतु त्यानंतर तू आणि पप्पांनी अनेक हालअपेष्टा सोसून सुरुवातीच्या काळात संसार केलास. पप्पांच्या खांद्याला खांदा लावून उभी राहिलीस. विशेष म्हणजे रस्त्याच्या कामात मजूर म्हणून काम करून जीवन व्यथित केलेस. त्या कठीण प्रसंगात संसाराला बळ दिलेस. त्यानंतर ही अनेक कठीण प्रसंगात तू पप्पांसोबत राहिलीस. आणि संसाराचा गाडा हाकलास. जेमतेम दुसरी शिक्षण झालेली तू आजच्या स्त्रियांना आदर्शवत आहेस. तुझ्याकडून त्यांनी संयम, धीर आणि स्वतःवरील विश्वास या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. कारण आजच्या काळात समाजात आपला पती जर अन्य कुठल्या बाईशी केवळ बोलताना दिसला तर ती पत्नी पतीपासून घटस्फोट घेते. मात्र तू आपल्या पतीच्या आयुष्यात दुसरी पत्नी येऊनही आपलेपणाने त्यांचे स्वागत केलेस, स्वीकार केलास.

प्रत्यक्षात त्यावेळी जर तू अविचार केला असतास, संयम बाळगला नसतास तर आज आम्ही रस्त्यावर आलो असतो. कौटुंबिक सुखाला मुकलो असतो. पित्याच्या प्रेमास मुकलो असतो. मिना आई आणि मावशी यांना तू बहिणीप्रमाणे प्रेम दिलेस आणि आदर्श संसाराची परिभाषा सर्व समाजाला दाखवलीस. देवाच्या कृपेने आणि पप्पांच्या कष्टाने चांगले दिवस आले; परंतु त्यानंतरही तू सर्वसामान्य गृहिणीप्रमाणे वावरलीस. मला तुझा अत्यंत अभिमान आहे. देवाने तुला उदंड व निरोगी आरोग्य देवो, ही माझ्याकडून आणि सर्व ठाकूर कुटुंबियांकडून शुभेच्छा!

**तुझाच...**
**ॲड. प्रवीण मधुकर ठाकूर**

# सेवानिवृत्त दाम्पत्याला लाखोंचा गंडा

## ■ खारघरमध्ये सायबर चोरट्यांचा डिजिटल ॲरेस्टचा भयानक फास; गुन्हा दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात अडकवून खारघर येथे राहणाऱ्या एका सेवानिवृत्त दाम्पत्याची तब्बल ४४ लाख ९१ हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या सायबर टोळीने चक्क आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांचे नाव आणि ईडीसारख्या सरकारी यंत्रणांचा वापर करून वृद्ध जोडप्याला भीती दाखवून त्यांना ऑनलाइन पद्धतीने ही



रक्कम पाठवण्यास भाग पाडल्याचे उघडकीस आले आहे.

खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर टोळीविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. फसवणूक झालेले ७८ वर्षीय ज्येष्ठ नागरिक खारघरमध्ये राहतात. गेल्या १५ ऑक्टोबर रोजी सायबर टोळीतील एकाने त्यांना संपर्क करून तो डेटा प्रोटेक्शन बोर्डातून शर्मा बोलत असल्याचे सांगितले. तसेच, नाशिकमधील काही लोकांकडून पैसे उकळल्याच्या तक्रारी त्यांच्याविरोधात मिळाल्याचे त्यांना सांगितले. याप्रकरणी नाशिक शहरातील रॉडरीक्स नावाच्या एका व्यक्तीने त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केल्याचे सांगितले. तर या सायबर टोळीतील दुसऱ्या आरोपीने पोलीस अधिकारी हेमराज कोहली असल्याचे भासवून या ज्येष्ठ नागरिकाला तपासामध्ये सहकार्य करण्यास सांगितले. सहकार्य न केल्यास एका तासाच्या आत त्यांना अटक करण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांनी या वयोवृद्ध दाम्पत्याला मोठ्या शिक्षेची भीती दाखवून विश्वासात घेतले. तसेच त्यांनी सहकार्य केले नाही, तर त्यांना ७ वर्षांची शिक्षा किंवा जन्मभर तुरुंगवास होईल, अन्यथा ५ कोटींचा दंड भरावा लागेल, अशी भीती दाखवली.

त्यानुसार या ज्येष्ठ नागरिकाने व त्यांच्या पत्नीने सायबर गुन्हेगारांनी सांगितल्याप्रमाणे सारस्वत बँक आणि शामराव विठ्ठल को-ऑप. बँक खात्यातून आरटीजीएसद्वारे एकूण ४४ लाख ९१ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने आरोपींच्या खात्यांवर पाठवले. मात्र, या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्वरित खारघर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर गुन्हेगारांविरोधात गुन्हा नोंद करून तपासाला सुरुवात केल्याचे सांगितले.

# इनरव्हील क्लबची वार्षिक बैठक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

इनरव्हील क्लब ही एक सामाजिक महिला संस्था असून इथे वेगवेगळ्या स्तरांत कार्यरत असणाऱ्या महिला एकत्र येऊन समाजकार्य करतात. ही संस्था मुख्यतः ग्रामीण, जिल्हा, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा चार पातळ्यांवर काम करते. ही कामे अतिशय पारदर्शी व नियमबद्ध पद्धतीने केली जातात. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हाच्या प्रमुख त्या जिल्ह्यातील सर्व क्लबना भेट देऊन त्यांच्या कामाची पडताळणी करतात. त्याच अनुषगांने डिस्ट्रीक्ट ३१३च्या



२०२५-२६च्या चेअरमन डॉ. आशा देशपांडे यांनी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीला भेट देऊन त्यांच्या कामकाजाची पहाणी केली.

नुकतीच दिवाळी पार पडल्याने दिवाळी हीच थीम घेऊन क्लबने दिव्यांच्या प्रकाशात डीसी डॉ. आशाजी यांचे संगीतमय स्वागत करून दीपप्रज्वलनाने कामकाजाची सुरवात केली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात डीसी सर्व कार्यकारिणी सदस्यांच्या कामकाजाची अतिशय बारकाईने पाहणी करून त्यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी परंपरेप्रमाणे क्लबमार्फत सिंपल व विजयता यांनी प्रत्येकी ३ - ३ हजार याप्रमाणे ६ हजार रुपयांची धनराशी दोन मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी आर.जे. शंकरा हॉस्पीटलला दिली. तसेच क्लब मार्फत पनवेल मधील नवकार युवक ग्रुप या संघटनेला ते करत असलेल्या डायलिसीसच्या सेवेसाठी ११००० रुपयाची मदत करण्यात आली. अशा पद्धतीने क्लबला सामाजिक बांधिलकी जपत अवघ्या चार महिन्यांत ५० प्रोजेक्ट पूर्णकरण्याची कौतुकास्पद कामगिरी पार पाडण्यात यश आले.

# फुंडे ग्रामपंचायतीतर्फे दिव्यांग निधी वाटप

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जेएनपीए प्रकल्पग्रस्त असलेल्या फुंडे ग्रामपंचायतीच्या वतीने सन २०२५-२६ या वर्षीच्या ५ टक्के दिव्यांग निधीचे वाटप करण्यात आला. यावेळी १८ दिव्यांगाना उपसरपंच चंद्रकांत म्हात्रे व ग्रामपंचायत सदस्या संपदा घरत यांच्या हस्ते निधी देण्यात आला. यावेळी दिव्यांग निधीचा धनादेश स्विकारतांना दिव्यांग बंधू भगिनींच्या चेहऱ्यावर उत्साह दिसत होता. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र सातंगे यांनी सालाबादप्रमाणे ग्रामपंचायतीकडे निधीची उपलब्धता झाल्यावर आम्ही दिव्यांग बंधूभगिनींना ५ टक्के



निधीतून सर्वच दिव्यांना दिव्यांग निधी उपक्रम पूर्णत्वास नेणार असल्याची माहिती दिली.

# देवनार रोटरी क्लबतर्फे शाळेला सोलर युनिट

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माध्यमिक आणि जिल्हा परिषद शाळांमध्ये संगणक, स्वच्छतागृह तसेच सोलर युनिट आणि मुलींसाठी सायकल भेट देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या देवनार रोटरी क्लबकडून दहिवलीतर्फे वरेडी ग्रामपंचायतमधील कोदीवले गावातील जिल्हा परिषद शाळेसाठी सोलर युनिट भेट देण्यात आले.



कोदीवले गावातील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी सोलर पॅनल मिळावे आणि शाळेतील अंधार दूर व्हावा, यासाठी स्थानिक दहिवलीतर्फे वरेडी ग्रामपंचायतीच्या सदस्यता मानसी संजय तरे यांनी रोटरी ग्रामीण मंडळाचे कर्जत तालुका समन्वयक अर्जुन तरे यांना पत्र देऊन मागणी केली होती. त्या मागणीनुसार देवनार रोटरीकडून सोलर पॅनल उभारण्यास परवानगी देण्यात आली. त्यांनतर देवनार रोटरी क्लबकडून कोदीवले येथील जिल्हा परिषद शाळेसाठी सोलर पॅनल बसवून देण्यात आले. साधारण दोन लाख रुपयांचा खर्च रोटरी क्लब देवनार यांच्याकडून करण्यात आला आहे. या सोलर पॅनेलचे लोकार्पण देवनार रोटरीच्या अध्यक्ष अलका मुरली यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी देवनार रोटरीचे झंकार गडकरी, कन्नन, राजू जोशी, अशोक नाईक, पराग काणेकर, ग्रामीण रोटरीचे अध्यक्ष अर्जुन तरे उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत सदस्यता मानसी तरे, शाळेचे शिक्षक संतोष कोडी, रुपाली कदम, गावातील ग्रामस्थ केशव तरे, संजय तरे, जनार्दन तरे, शेखर तरे, दिनेश तरे, भगवान तरे, रघुनाथ तरे, रविना तरे तसेच पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# रोहा तालुक्यात गुलाबी थंडीची चाहूल



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

परतीचा पाऊस दोन दिवसापासून नाहीसा झाल्यामुळे रोहा तालुक्यात गुलाबी थंडी पडू लागल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. गुलाबी थंडी म्हणजे सुखदायक आणि आल्हाददायक गारवा. जो विशेषता हिवाळ्याच्या सुरुवातीला अनुभवला जातो. जेव्हा तापमान खूप कमी नसते; पण हवेत गारवा असतो. या थंडीमध्ये सकाळी थंडी असते. पण दुपारी ऊन पडते. यामुळे वातावरण आल्हादायक बनते. गुलाबी थंडी साधारण नोव्हेंबर ते जानेवारी महिन्यात असते ती आरोग्यासाठी चांगली मानली जाते. पण या ऋतूत शरीरातील रुक्षता आणि कोरडेपणा वाढतो. गुलाबी थंडीत शरीराची काळजी घेणे गरजेचे असते. या ऋतूत ढगाळ वातावरण, पाऊस आणि वाढलेल्या थंडीमुळे तो रोगट ठरत आहे. वातावरणातील बदलामुळे विविध आजारांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे आहारात थोडे पालट करणे महत्वाचे आहे. यामुळे गुलाबी थंडी जरी शरीराला अल्हाददायक असली तरी काळजी घेणे तेवढेच महत्वाचे आहे.

### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर
# कार्यकर्त्यांची बैठक

**पनवेल :** आगामी पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कामोठे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व वीर शैव कक्कया ढोर समाज मंडळ कामोठे यांच्या सर्व पदाधिकारी यांची शिवसेना पक्षाच्या कार्यालयामध्ये महत्वाची बैठक झाली. यावेळी त्या मंडळाचे तरुण कार्यकर्ते व शिवसेना उप शहरप्रमुख व कामोठे प्रभाग १३ चे महानगरपालिकेचे उमेदवार सचिन मनोहर त्रिमुखे आणि मंडळाचे अध्यक्ष विलास बाबू खरटमोल प्रभाग ११चे उमेदवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तसेच शिवसेनेचे कामोठे शहर संघटक बबन गोळे आणि प्रभाग १३ चे विभाग अध्यक्ष बबन गोगावले यांनी निवडुकीची तयारी आणि जनतेला संघटित कशा प्रकारे करावे याबद्दल मार्गदर्शन केले.

# मृतावस्थेत अर्भक सापडल्याने खळबळ

**पनवेल :** कळंबोली सेक्टर-१ परिसरात दोन दिवसांचे अर्भक मृतावस्थेत सापडल्याने या परिसरात खळबळ उडाली आहे. स्थानिक रहिवाशांना रस्त्यालगत एक अर्भक आढळून येताच त्यांनी तात्काळ कळंबोली पोलिसांना ही माहिती दिली. पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत अर्भकाला उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले. प्राथमिक अंदाजानुसार, अर्भकाला जाणीवपूर्वक टाकून दिल्याची शक्यता वर्तवली जात आहे. लोकवस्तीत अर्भक आढळल्यानंतर परिसरात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, येथील रहिवाशांनी या कृत्याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास कळंबोली पोलीस ठाण्याचे पो.नि. अभयसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलीस सीसीटीव्ही फूटेज, स्थानिक माहितीदार यांच्यामार्फत करीत आहेत. या अर्भकाला कोणी व कोणत्या परिस्थितीत टाकून दिले याप्रकरणी पोलिसांकडून सखोल तपास केला जात असून, लवकरच या प्रकरणाचा उलगडा होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# वनवठेमधील नागझिरी बारवची स्वच्छता

## श्रीमद्रायगिरौ प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम



**। वावोशी । प्रतिनिधी ।**

गडकोट, मंदिरे आणि ऐतिहासिक ठेवा वाचवा, हा संदेश देत समाजासाठी सातत्याने काम करणाऱ्या श्रीमद्रायगिरौ प्रतिष्ठानने पुन्हा एकदा प्रेरणादायी उदाहरण समोर ठेवले आहे. वनवठे येथील प्राचीन नागझिरी बारव स्वच्छतेच्या मोहिमेमुळे नव्याने उजळली असून, परिसरात पुन्हा एकदा इतिहास जागा झाला आहे.

गेल्या काही वर्षांपासून प्रतिष्ठानने आळे फाटा रेडा समाधी, साजगाव, कराडे, मोहोपाडा अशा अनेक ठिकाणी जाऊन गडदुर्ग, बारव व भुईकोटांची साफसफाई केली आहे. या वेळी त्यांनी खालापूर तालुक्यातील वनवठे येथील नागझिरी बारव हाती घेतली. बारव चिखलाने भरून नादुरुस्त अवस्थेत होती. प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी पाहणी करून ती पूर्णपणे स्वच्छ केली आणि त्याला सुव्यवस्थित रूप दिले. पूर्वीच्या काळात या बारवचा उपयोग व्यापार करणारे लोक तसेच आसपासच्या सात-आठ गावांतील ग्रामस्थ पिण्याच्या पाण्यासाठी करत असत, अशी माहिती प्रतिष्ठानच्या सदस्यांनी दिली. आता ही बारव पुन्हा एकदा गावकऱ्यांसाठी अभिमानाचा ठेवा बनली आहे.

या स्वच्छता मोहिमेत ३५ ते ४० सभासदांचा उत्स्फूर्त सहभाग होता. प्रतिष्ठानमध्ये एकूण २०० हून अधिक महिला-पुरुष कार्यरत असून, सर्वजण नोकरदार वर्गातील आहेत. परंतु, आठवड्यातील एक सुट्टी समाजासाठी देण्याचा त्यांचा नित्यनेम आहे. विशेष म्हणजे या मोहिमांसाठी कोणतेही अनुदान न घेता हे कार्यकर्ते स्वखर्चाने सहभागी होतात, हेच त्यांच्या सेवाभावाचे खरे दर्शन आहे.

# पळस्पे येथून दुचाकीची चोरी

**पनवेल :** पनवेल जवळील मॅरेथॉन नेक्सान, ॲन्टेलीया बिल्डींग येथील बी वन पार्कीग पळस्पे येथून एका मोटारसायकलीची चोरी झाल्याची घटना घडली. बळीराम रामदास बागवाले यांनी त्यांची १० हजार रुपये किंमतीची काळ्या रंगाची हिरो होन्डा कंपनीची पेंशन प्रो मोटारसायकल क्रमांक एमएच ४६ ४६ क्यू ९११४ ही बिल्डींगच्या पार्किंगमध्ये पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आली असून पोलीसोकडून आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

# टाळ-मृदुंगाच्या गजराने महामार्ग दुमदुमला

## लाखो वारकरी घेणार माऊलीचे दर्शन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

श्री क्षेत्र आळंदी येथे ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शन घेण्यासाठी पायी दिंडीचे आयोजन करण्यात येते. ह.भ.प. रामदास महाराज पाटील, सिद्धबेट वारकरी संप्रदाय चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत सिद्धबेट पायी दिंडी सोहळा श्री क्षेत्र आळंदी, संस्थापकीय गेली ४ वर्ष या दिंडीचे आयोजन करत असल्याचे दिंडीत सहभागी झालेल्या वारकरी यांनी सांगितले.



राज्यभरातून वारकऱ्यांच्या दिंड्या निघत असल्यामुळे अवघा रंग एक झाला! असेच काही चित्र या महामार्गावर पहावयास मिळत आहे. यामुळे आळंदीच्या दिशेने जाणाऱ्या दिंड्या टाळ-मृदंगाच्या गजरात व ज्ञानोबा-तुकारामाच्या जयघोषात हा परिसर दुमदुमत आहे. एकादशी निमित्ताने आळंदी येथे संजीवन सोहळा सुरू झाला आहे. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी अनेक दिंड्या आळंदीत येत ज्ञानेश्वर माउलीचे दर्शन घेण्यांसाठी जात असतात.

भक्तिसागरात मुंबई-पुणे महामार्ग न्हाऊन निघाला आहे. ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात महामार्गावरून जाताना वारकऱ्यांची शिस्तबद्ध पद्धतीने ही दिंडी प्रस्थान करते. मा. सरपंच गोपीनाथ जाधव, उत्तम भोईर, लायन्स क्लब खालापूर अध्यक्ष किशोर पाटील, नरेश पाटील, दत्तात्रय जाधव, प्रभाकर ठोंबरे, जनार्दन जाधव, शांताराम जाधव, राजेश जाधव, मंगेश पाटील, रमेश जाधव, चंद्रकांत जाधव, प्रभाकर जाधव, राजेश पाटील आदींनी या दिंडीचे स्वागत केले.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- "जन्नावार हॉस्पीटल" अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321
- पाहिजे- अलिबागस्थित वृद्ध जोडप्यास सकाळी साडेदहा ते दीडवाजेपर्यंत किचन मदतनीस बाई. पगार पाच हजार आणि एका वेळचे जेवण. संपर्क- ८५३०३०९७६५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### २७ शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग | उपस्थितांनी केले दुर्बिण, कॅमेराद्वारे पक्षीदर्शन

# पक्षी निरीक्षण, जनजागृती कार्यक्रम

**। उरण । प्रतिनिधी ।**

फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर, उरण रायगड (महाराष्ट्र) तर्फे कोमना देवी ऑक्सिजन पार्क, सारडे-उरण येथे रविवारी (दि.९) पक्षी सप्ताह २०२५फ निमित्ताने पक्षी निरीक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सुमारे २७ शालेय विद्यार्थी व रा.जि.प प्राथमिक शाळा, सारडे शाळेच्या मुख्याध्यापिका समृद्धी संजय वऱ्हाडी उपस्थित होत्या.





संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर व फॉन पक्षी सप्ताह २०२५ समन्वयक व सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी प्रथम विद्यार्थ्यांना पक्षी सप्ताह म्हणजे काय? त्याची पार्श्वभूमी काय? अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली व भारताचे पक्षी मानव डॉ. सालिम अली यांच्याविषयी माहिती सांगितली. जंगलात पक्षी कसे पहावे व पाहताना कोणती खबरदारी घ्यावी, पक्ष्यांचे आवाज, आकार, रंग, अधिवास प्रकार व त्यानुसार आढळणारे पक्षी प्रकार, पक्ष्यांचे मानवास फायदे या बद्दल उपस्थितांना माहिती दिली. त्यानंतर पक्षी निरीक्षणास सुरुवात केली. विद्यार्थी व उपस्थित सदस्यांना दुर्बिण व कॅमेरामध्ये पक्षी दाखविले. तसेच इबर्ड्स ऑफ द इंडियन सबकॉन्टिनेन्टफ या क्षेत्र मार्गदर्शिकेतून पक्षी व त्यांची ओळख कशी केली जाते, याचे प्रात्यक्षिक दाखविले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांसाठी फॉन संस्थेमार्फत अल्पोपहाराची सोय देखील करण्यात आली.

पक्षी सप्ताह २०२५ च्या या कार्यक्रमासाठी फॉन संस्थेचे सचिव शेखर म्हात्रे, सदस्य प्रीतम पाटील, तुषार म्हात्रे, स्वप्नील म्हात्रे, फॉन नेक्स्ट जनरेशन हर्षित म्हात्रे, सर्वज्ञ पाटील तसेच संस्थेचे हितचिंतक निलेश पाटील, हर्षद कडू, देवांश कडू आणि सारडे गावातील सामाजिक कार्यकर्ते व निसर्गमित्र संपेश पाटील व सुभाष पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

### २३ प्रकारच्या पक्षी प्रजातींची नोंद

पक्षी निरीक्षण करताना सारडे येथे जांभळा शिंजीर, जांभळ्या पुठ्ठ्याचा शिंजीर, पांढऱ्या कंठाची मनोली, मोर शराटी, पांढऱ्या मानेचा करकोचा, धीवर तर शिकारी पक्ष्यांमध्ये मोठा ठिपक्यांचा गरुड, छोटा ठिपक्यांचा गरुड, दलदली भोवत्या, शिक्रा, घार, इत्यादी पक्षी सुमारे २३ प्रकारच्या पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद इबर्ड या संकेतस्थळावर करण्यात आली.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# मुंबईत मतचोरीविरोधात जनजागृती

## युवक काँग्रेसचे मेट्रो व लोकलमध्ये अभियान

| मुंबई | प्रतिनिधी |

देशात निवडणूका निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने पार पाडणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे, पण लोकशाहीच्या या महत्त्वाच्या स्तंभावर संशयाचे ढग जमा झाले आहेत. भारतीय जनता पक्ष निवडणूक आयोगाच्या मदतीने मतचोरी करत असल्याचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दाखवून दिले आहे. या मतचोरीविरोधात मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्त्वाखाली युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मुंबई मेट्रो आणि लोकल ट्रेनमध्ये माहिती पत्रके वाटत मतचोरीविरोधात जनजागृती केली.



मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन आणि पदाधिकाऱ्यांनी घाटकोपर ते साकीनाका व अंधेरी ते गोरेगाव मार्गावर मेट्रो आणि लोकलमधून प्रवास करून प्रवाशांशी संवाद साधत निवडणूक आयोग व भाजपाच्या मतचोरीची पर्दाफाश केला.

याबाबतची माहितिपत्रके वाटून लोकांमध्ये जगजागृती करत त्यांना वोटचोरीची माहिती दिली. लोकशाहीच्या रक्षणासाठी जागरूक नागरिकांनी या वोटचोरीविरोधी आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी लोकशाही व संविधान रक्षणासाठी लढत आहेत. निवडणूक आयोगाचा भ्रष्ट कारभारही त्यांनी पुराव्यासह उघड करून लोकशाहाचा गळा घोटण्याऱ्यांचा पर्दाफाश केला आहे. राहुल गांधी यांच्या संघर्षात युवक काँग्रेस पूर्ण ताकदीने उभी असून मतचोरीविरोधी जनजागृती करत आहोत, असे मुंबई युवक काँग्रेस अध्यक्ष झीनत शबरीन यांनी सांगितले.

# मुंबईत संविधान सन्मान महासभा

## वंचित बहुजन आघाडीची घोषणा

| मुंबई | प्रतिनिधी |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेत केलेल्या ऐतिहासिक भाषणाच्या पार्श्वभूमीवर, वंचित बहुजन आघाडीच्या वतीने यावर्षी २५ नोव्हेंबर २०२५ रोजी शिवाजी महाराज मैदान, दादर (शिवाजी पार्क) येथे संविधान सन्मान महासभा आयोजित करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर आज मुंबईत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. पत्रकार परिषदेला मुंबई प्रदेशाध्यक्ष चेतन अहिरे, वंचित बहुजन महिला आघाडी मुंबई अध्यक्षा स्नेहल सोहनी व युवा आघाडी मुंबई अध्यक्ष सागर गवई उपस्थित होते.

यावेळी मुंबई प्रदेशाध्यक्ष चेतन अहिरे यांनी सांगितले की, २५ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण भारतीय लोकशाहीचे दिशादर्शक भाषण होते. देशात संविधान लागू होण्याआधी बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिशा दिली होती. आज देशात संविधानविरोधी वातावरण तयार होत आहे. राज्यकर्ते संविधानाची पायमल्ली करत असल्याने जनतेत असंतोष आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी संविधान सम्मान महासभेद्वारे देशाला पुन्हा दाखवून देऊ की, हा देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानुसार चालेल, मनुवादाने नाही.

२५ नोव्हेंबर २०२३ रोजी शिवाजी मैदानावर झालेल्या संविधान सम्मान महासभेला सुमारे एक लाख फुले-शाहू-आंबेडकरवादी जनता उपस्थित होती. यावर्षीची सभा त्याहून मोठी होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे या महासभेचे प्रमुख मार्गदर्शक असतील. तसेच देशभरातील महत्त्वपूर्ण मान्यवर या सभेला उपस्थित राहणार असून, त्यांच्या नावांची घोषणा लवकरच केली जाणार आहे.

# हरिहरेश्वर येथे कालभैरव उत्सव

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथे दि.११ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत प्रतिवर्षीप्रमाणे कालभैरव जयंती उत्सव होणार आहे. या जयंती उत्सव कार्यक्रमात दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी लघुरुद्र, अभिषेक सेवा असून, बुधवार दि.१२ नोव्हेंबर रोजी रात्री १०.३० वा. कीर्तन, रात्री १२.३९ वा. श्रींचा जन्मकाळ आहे. तर गुरुवार दि. १३ नोव्हेंबर रोजी स. ११.३० ते २.३० वा. महाप्रसाद होणार असून, लळीताचे कीर्तनही होणार आहे.

यावर्षी पुणे येथील कीर्तनकार संदीपबुवा मांडके यांच्या कीर्तन सेवेचा लाभ भक्तांना मिळणार आहे. तसेच भजन, प्रवचन इ. धार्मिक कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. या उत्सव कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय मधुकर नागले व कार्यवाह जगदीश मधुकर कुलकर्णी हे असून, उत्सव समिती उत्सवाच्या यशस्वीतेसाठी कार्यरत आहे. या उत्सवास गेल्या सुमारे १२९ वर्षांची परंपरा आहे.

# कृषी समृद्धी योजना राबवण्यास राज्य सरकारकडून मान्यता

| मुंबई | प्रतिनिधी |

कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निर्मितीसाठी गुंतवणूक करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं आहे. यातून शेतकऱ्यांना पुन्हा उभारी मिळावी यासाठी सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. कृषी समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ड्रोन, शेततळे, सुविधा केंद्र आणि ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्रांसाठी सरकारकडून अनुदान देण्यात येणार आहे.

यासाठी राज्य सरकारने पुढील ३ वर्षासाठी ५ हजार ६६८ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे, अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या अनुषंगाने आणि बदलत्या हवामानामुळे अतिवृष्टीसारख्या निर्माण होणाऱ्या संकटास सामोरे जाण्यासाठी कृषी विभागाने राबविलेली कृषी समृद्ध योजना शेतकऱ्यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरेल असं त्यांनी म्हटले आहे.

राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या प्रचलित योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्र, वैयक्तिक शेततळे, शेतकरी सुविधा केंद्र उभारणी आणि मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन हे घटक अधिक विस्तृत स्वरुपात राबवून राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने आजच्या शासन निर्णयान्वये उक्त घटकांची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलीआहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना फायदा मिळण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या संकल्पनेतून या योजनेला विस्तृत स्वरुपं मिळालं आहे.

श्री. भरणे पुढे म्हणाले, सरकारने २ हजार ७७८ शेतकरी सुविधा केंद्रे उभारण्यास मान्यता दिली आहे. प्रत्येक केंद्रासाठी सरासरी प्रकल्प खर्च ३ कोटी रुपये असून कमाल सरकारी अनुदान मर्यादा १ कोटी ८० लाख रुपये ठेवण्यात आले आहे. यामध्ये मृद परीक्षण प्रयोगशाळा, जैविक खत उत्पादन केंद्र, भाडेतत्त्वावर अवजारे व ड्रोन उपलब्धता केंद्र, गोडाऊन व शीतसाखळी सुविधा, कीडनियंत्रण सामग्री व अन्नद्रव्य घटक याचा समावेश आहे.

### योजनेसाठी कोण पात्र?

२०२५-२६ ते २०२७-२८ या तीन वर्षासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून अर्जदार राज्यातील सातबाराधारक असणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक फार्मर नोंदणी क्रमांक आवश्यक आहे. लाभार्थी शेतकऱ्याने कृषी विभागाच्या महाडीबीटीवर ऑनलाईन अर्ज केल्यावर प्रथम येणाऱ्यास प्रथम लाभ या तत्त्वावर लाभार्थी निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांना डीबीटीतून थेट बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्या महाडीबीटीवर अर्ज करून लाभ घेऊ शकतात.

# मुख्यमंत्री सहायता निधीसाठी अडीच लाखांचा धनादेश

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

आदर्श शैक्षणिक समूह आणि पदवीधर प्रकोष्टच्या वतीने धनराज विसपुते यांनीमुख्यमंत्रीसहायता निधीसाठी दोन लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या उपस्थितीत दिला.



यावेळी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अहोरात्र झटणाऱ्या मुख्यमंत्री यांच्या कार्यात खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाली हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा व समाधानाचा क्षण असल्याचे धनराज विसपुते यांनी सांगितले. हा धनादेश मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आला.

# कर्जत आणि माथेरान नगरपरिषद निवडणूक

## आजपासून नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरुवात

नेरळ, प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील दोन नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या असून, दोन डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या १० नोव्हेंबरपासून नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरुवात होत आहे. कर्जत नगरपरिषदेची २१, तर माथेरान नगरपरिषदेच्या २० जागांसाठी आणि थेट नगराध्यक्षपदासाठी ही सार्वत्रिक निवडणूक होणार आहे.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील क वर्ग दर्जाची कर्जत नगरपरिषद आहे, तर माथेरान गिरीस्थान नगरपरिषद ही पर्वतीय नगरपरिषद आहे. या दोन्ही नगरपरिषदा यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दोन नोव्हेंबर रोजी



मतदान होणार आहे. या दोन्ही नगरपरिषद निवडणुका यांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर असून, उद्या १० नोव्हेंबरपासून निवडणूक प्रक्रिया सुरु होत आहे. उद्या सोमवार १० नोव्हेंबरपासून नामांकन अर्ज भरण्यास सुरुवात होणार असून १७ नोव्हेंबर दुपारी तीन वाजेपर्यंत नामांकन अर्ज भरता येणार आहेत. कर्जत नगरपरिषदेसाठी थेट नगराध्यक्ष आणि दहा प्रभागांतून २१ सदसय निवडून देण्यासाठी निवडणूक होणार आहे. त्यात थेट नागरध्यक्षपद हे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव असून, ११ सदस्यांमध्ये ११ सर्वसाधारण तर तीन अनुसूचित जाती आणि एक अनुसूचित जमाती तर नागरिकांचा मागासप्रवर्गसाठी पाच जागा यांचे आरक्षण आहे. महिला आरक्षण पन्नास टक्के आहे. कर्जत नगरपरिषदेसाठी २९,९५७ मतदार असून, दोन डिसेंबर रोजी मतदानासाठी ३७ मतदान केंद्रे उभारली जाणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. धनंजय जाधव यांनी दिली आहे.

माथेरान या गिरिस्थान नगरपरिषदेसाठी थेट नगराध्यक्ष आणि दहा प्रभागांतील २० सदस्य निवडण्यासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. माथेरान पालिकेच्या निवडणुकीसाठी ४०५५ मतदार असून, पर्वतीय नगरपरिषद १०० हून अधिक वर्षे जुनी नगरपरिषद आहे.

# पायी दिंड्यांचे आळंदीकडे प्रस्थान

| रसायनी | प्रतिनिधी |

कोकणातून वारकरी संप्रदाय यांच्या कार्तिकी एकादशीची आळंदीवारी यांचे प्रस्थान सुरू झाले असून, रायगड, ठाणे, पालघर जिल्ह्यातून सुरू झाल्या. या पायी दिंड्यांचे गावोगावी मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे. त्यावेळी गावात प्रवचन, हरिपाठ, कीर्तन होते. ग्रामस्थांकडून अन्नदान केले जाते. चातुर्मासाच्या निद्रेनंतर भगवान विष्णू (विठ्ठल) जागे होतात, असे म्हटले जाते.



आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकीएकादशीलाहीहजारोवारकरी आळंदीला दर्शनासाठी पायी चालत जातात. कार्तिक महिन्याच्या पहिल्या दिवसापासून वारीला सुरुवात होते. कार्तिकी एकादशीला आळंदीत येऊन वारकरी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतात. आषाढी एकादशीला आळंदीहून पंढरपूरकडे वारी जाते, तर कार्तिकी एकादशीला पंढरपूरहून आळंदीकडे वारी परत येते, असेही काही जण मानतात. या दिवशी हजारो भाविक आळंदीत दाखल होतात आणि संजीवन समाधी सोहळ्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने वारकरी आळंदीला संत ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेण्यासाठी येतात.

कार्तिकी एकादशीला संत ज्ञानेश्वर महाराजांचे महत्त्व अधिक मानले जाते. कार्तिकी एकादशीच्या पार्श्वभूमीवर आळंदीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्याचा समावेश असतो.

# सुधागडात टेलरिंगच्या तिसऱ्या बॅचचे उद्घाटन

## पहल नर्चरिंग लाईव्सचा स्तुत्य उपक्रम

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

सुधागड-पाली परिसरातील महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या पहल नर्चरिंग लाईव्स या संस्थेच्यावतीने टेलरिंग प्रशिक्षणाच्या तिसऱ्या बॅचचे उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. सुधागड-पाली येथील केंद्रात आयोजित या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला.



या उपक्रमामार्फत महिलांना टेलरिंगसारख्या उपयुक्त कौशल्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि त्यांना उद्योजकतेकडे प्रवृत्त करणे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे कोऑर्डिनेटर संजय बंजारा यांनी केले. संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती आणि उपक्रमाची सविस्तर प्रस्तावना अजय गाडे (मॅनेजर, पहल) यांनी सादर केली. कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन रामदास करकरे (कोऑर्डिनेटर, सुधागड-पाली शाखा) यांनी केले.

या कार्यक्रमास पहल संस्थेचे कार्यकारी सदस्य सुनील भालेराव आणि माधुरी फराट यांची विशेष उपस्थिती लाभली होती. त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत महिलांच्या सक्षमीकरणासाठी अशा प्रशिक्षण उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष सुलतान बेणसेकर, माजी सभापती साक्षी दिघे, समाजकल्याण वसतिगृह निरीक्षक ज्योती जावके, नगरसेवक आशिफ मणियार, महिला व बालकल्याण समितीचे जिल्हा समन्वयक प्रकाश पवार, तालुका समन्वयक मिथुन गुंजाळ (खालापूर) आणि समन्वयक सारिका म्हात्रे यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या.

या मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थी महिलांना आवश्यक टेलरिंग किटचे वितरण करण्यात आले. यामध्ये शिलाई साहित्य, मोजमाप साधने, कापडाचे नमुने, आणि प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेली साधने यांचा समावेश होता. प्रशिक्षणाच्या सुरुवातीपासूनच महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पहल संस्थेच्या संपूर्ण टीमने परिश्रम घेतले. स्थानिक पातळीवरून मिळालेला प्रतिसाद पाहता, भविष्यात अशा आणखी बॅचेस सुरू करण्याचा मानस संस्थेने व्यक्त केला आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| थळ ता.अलिबाग | २२१/२ | बागायत ०-०८-७० <br> पो.ख.क्षेत्र ०-०२-०० <br> एकुण क्षेत्र ०-१०-७० | १.६९ |

सदर वर नमुद मिळकत ही विद्यमान मालक संदीप बाळकृष्ण माळी, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवंसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०९/११/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी **श्री. महमद तफशिरयार महमद खान** यांचेकडून बक्षीसपत्राने घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हनुमाननगर, ता. तळा, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| १३ | २.२८.०० | ०.९४ |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी - हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल बक्षीसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १०-११-२०२५

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल. एल. बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१९४९४
९०११७१६००१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी **श्री. यारमहमद लल्लन खान** यांचेकडून बक्षीसपत्राने घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हनुमाननगर, ता. तळा, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| २६ | २.५९.०० | १.२९ |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल बक्षीसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १०-११-२०२५

**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल. एल. बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१९४९४
९०११७१६००१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली मौजे सारळ-दत्तपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड येथील श्री. अरविंद गुरुनाथ साखळकर यांच्या मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीतील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्यामधील घर व विहिरीसह आमचे अशिलांनी खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे सारळ-दत्तपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील नगर भूमापन क्रमांक १८६ क्षेत्र ५५१.०० चौ.मी. गांव दत्तपाडा गट क्रमांक व उपविभाग २/२ ही बिनशेती मिळकत व त्यामधील दत्तपाडा मालमत्ता क्रमांक ३१२ क्षेत्र ९५०.०० चौ.फुट (८८.२९ चौ.मी.) या मोजमापाची घर मिळकत व सदर मिळकतीमध्ये असलेली विहीर या नोटीसचा विषय आहे.

वर नमूद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणापावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत/खरेदीखत, गहाण, दान, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क, जाणे येणेचा मार्ग अथवा अन्य प्रकारचा कोणताही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमुद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून तसेच सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १०-११-२०२५

सही/-
**ॲड.जयवंत ह.घरत**
एम.ए.एल एल.एम.
बी/१०२, 'चित्रा-तारांगण' महर्षी कर्वे रोड
बँक ऑफ महाराष्ट्र समोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# आयपीएल लिलावाची उत्सुकता वाढली

## डिसेंबरमध्ये संघांना पुनर्बांधणीची संधी




**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ स्पर्धा पुढच्यावर्षी होणार असली, तरी त्याआधी होणाऱ्या लिलावाबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. या लिलावातून अनेक संघात मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आता हा लिलाव कधी होणार आणि त्याआधी खेळाडूंना संघात कायम करण्याची आणि करारमुक्त करण्यासाठी अखेरची तारीख काय असेल, याबाबतची माहिती समोर आली आहे.

आत्तापर्यंत आयपीएलचे १८ हंगाम यशस्वीपणे पार पडले आहेत. आता २०२६ मध्ये होणारा १९ वा हंगाम असणार आहे. १८ व्या हंगामापूर्वी मेगा ऑक्शन झाले होते, त्यात जवळपास सर्वच संघात उलथापालथ झाल्या होत्या. त्यावेळी काही संघांसाठी हा लिलाव फायद्याचा ठरला, तर काहींसाठी तोट्याचा ठरला. तसेच, महागड्या खेळाडूंचे विक्रमही तुटले होते. आता १९ व्या हंगामासाठी होणारा लिलाव छोटा असेल. परंतु, गेल्या हंगामात खराब कामगिरी झालेल्या संघांना या लिलावातून संघाची पुर्नबांधणी करता येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आयपीएल २०२६साठी खेळाडूंचा लिलाव डिसेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होऊ शकतो. त्यातही १३ ते १५ डिसेंबरच्या दरम्यान हा लिलाव होण्याची दाट शक्यता आहे. परंतु, अद्याप बीसीसीआयने अधिकृत वेळापत्रक तयार केलेले नाही. तसेच, गेल्या हंगामाप्रमाणे यंदा लिलाव परदेशात न होता भारतातच होण्याची शक्यता आहे. दरम्यान, जर लिलाव डिसेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होणार आहे, तर फ्रँचायझींना या हंगामासाठी कोणत्या खेळाडूंना संघात ठेवायचे आणि कोणाला करारमुक्त करायचे याची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर असणार आहे. त्यामुळे १५ नोव्हेंबरपर्यंत सर्व फ्रँचायझींना ही यादी घोषित करावी लागणार आहे. यावेळी ही यादी घोषित करताना अनेक आश्चर्याचे धक्के बसण्याचीही शक्यता आहे.

आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स सर्वात शेवटच्या स्थानांवर होते, अशात हे दोन्ही संघ अनेक खेळाडूंना करारमुक्त करण्याची शक्यता आहे. चेन्नई सुपर किंग्सचा आर अश्विन आधीच निवृत्त झाल्याने त्याला देण्यात आलेली ९.७५ कोटींची किंमत चेन्नईच्या पर्समध्ये आहे. याशिवाय ते दीपक हुडा, विजय शंकर, राहुल त्रिपाठी, डेवॉन कॉनवे यांना करारमुक्त करण्याची शक्यता आहे. याशिवाय राजस्थान रॉयल्सही संजू सॅमसनचे ट्रेडिंग करण्याच्या प्रयत्नात असल्याचे समजत आहे. याशिवाय ते महिश तिक्षणा आणि वनिंदू हसरंगा यांनाही मुक्त करण्याची शक्यता आहे. कोलकाता नाईट रायडर्स वेंकटेश अय्यरला मुक्त करू शकतात. त्याच्यासाठी त्यांनी तब्बल २३.७५ कोटी रुपये मोजले होते.

# खालापूरच्या 'लावण्या'चा देशात डंका

**| रसायनी | प्रतिनिधी |**



खालापूर तालुक्यातील उदयोन्मुख कुस्तीगीर लावण्या देशमुख हिने आपल्या दमदार खेळाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावरही यशाची नवी गाथा रचली आहे. पानिपत-हरियाणा येथे झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत तिने कांस्यपदक पटकावले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

लावण्या देशमुख हिने आतापर्यंत अनेक राज्यस्तरीय पदकांची कमाई केली असून, २०१८ मध्ये राज्यस्तरीय कांस्य, २०२२ मध्ये राज्य अजिंक्यपद रौप्य, २०२३ मध्ये ताराराणी केसरी रौप्य आणि कोकण केसरी सुवर्ण, २०२४ मध्ये मावळ केसरी सुवर्ण आणि राज्यस्तरीय रौप्य, तर २०२५ मध्ये राज्यस्तरीय सुवर्णपदक मिळवत तिच्या यशाची मालिका सुरूच ठेवली आहे. आता राष्ट्रीय स्तरावरही पदक पटकावत लावण्याने आपल्या कुस्ती कारकिर्दीला नवे वळण दिले आहे. तिच्या या यशाबद्दल खालापूर तालुक्यातील विधितज्ञ मीना बाम, नागरी सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा वर्षा मोरे व दिनकर भुजबळ आदी मान्यवर मंडळीकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, स्थानिक क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## आकाश चौधरीची ऐतिहासिक कामगिरी

**| सुरत | वृत्तसंस्था |**

रणजी चषक स्पर्धेतील चौथ्या फेरीत मेघालय संघाचा सामना अरुणाचल प्रदेशविरुद्ध सुरतमध्ये सुरू आहे. या सामन्यात मेघलायकडून खेळणाऱ्या २५ वर्षीय अष्टपैलू आकाश चौधरीने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याने रविवारी (दि.९) सामन्याच्या दुसऱ्या दिवशी वादळी खेळ करताना सलग ८ षटकार ठोकण्याचा पराक्रम गाजवला आहे. त्याने १२६व्या षटकात ६ चेंडूत ६ षटकार मारले. याशिवाय पुढच्या षटकात देखील सलग दोन षटकार मारले आणि अवघ्या ११ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले.

# भारताच्या अनुभवी खेळाडूंना विश्रांती



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

मलेशियातील इपोह येथे होणाऱ्या अझलान शाह करंडक हॉकी स्पर्धेसाठी अनुभवी खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. ही स्पर्धा २३ ते ३० नोव्हेंबरदरम्यान पार पडणार आहे. तसेच, संजय याची कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

त्याचबरोबर भारतीय संघाचे दोन्ही पहिल्या पसंतीचे गोलरक्षक कृष्ण बहादूर पाठक आणि सूरज करकेरा यांना विश्रांती देण्यात आली आहे आणि त्यांच्या जागी पवन आणि मोहित होन्नेहळी शशिकुमार यांचा समावेश करण्यात आला आहे. नियमित कर्णधार हरमनप्रीत सिंग, अनुभवी मधल्या फळीतील खेळाडू मनप्रीत सिंग आणि आघाडीचा खेळाडू मनदीप सिंग या तिघांनाही या स्पर्धेसाठी विश्रांती देण्यात आली आहे. बचावफळीत संजय, जुगराज सिंग आणि अमित रोहिदास हे तीन वरिष्ठ खेळाडू असतील. त्यांच्या जोडीला पूवन्ना चंदूरा बोबी, निलम संजीप ॲक्सेस आणि यशदीप सिवाच यांचा समावेश आहे. मधल्या फळीत राजिंदर सिंग, राजकुमार पाल, नीलकंठ शर्मा, रबिचंद्र सिंग मोइरंगथेम, विवेक सागर प्रसाद आणि मोहम्मद रहील मौसिन खेळणार आहेत. आघाडी फळीची जबाबदारी सुखजीत सिंग, शिलानंद लाक्रा, सेल्वम कार्थी, आदित्य अर्जुन लालगे, दिलप्रीत सिंग आणि अभिषेक यांच्या खांद्यावर असेल.

भारताची सलामीची लढत २३ नोव्हेंबर रोजी कोरियाविरुद्ध होणार आहे. त्यानंतर बेल्जियम (२४ नोव्हेंबर), यजमान मलेशिया (२६ नोव्हेंबर), न्यूझीलंड (२७ नोव्हेंबर) आणि कॅनडा (२९ नोव्हेंबर) यांच्याशी सामने होतील. पहिल्या दोन संघांमध्ये ३० नोव्हेंबर रोजी अंतिम सामना होईल. या स्पर्धेत भारताने अखेरचे विजेतेपद २०१० मध्ये मळिवले होते. त्यानंतर २०१९ मध्ये उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते.

# हे यश आत्मविश्वास वाढवणारः सूर्यकुमार यादव

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**



भारतीय संघाने नुकतीच ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिका २-१ ने जिंकली. त्यामुळे आगामी टी-२० विश्वचषकासाठी हे यश आत्मविश्वास वाढवणारे ठरले आहे. असे म्हणत कर्णधार सूर्यकुमार यादवने गोलंदाजांचे देखील कौतुक केले आहे.

भारतीय क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलिया दौऱ्यात एकदिवसीय मालिका गमावल्यानंतर टी-२० मालिकेत मात्र दमदार खेळ केला आणि मालिकाही जिंकली. ऑस्ट्रेलियाविरुद्ध शनिवारी (दि.९) पार पडलेला पाचवा टीॠ२० सामना पावसामुळे रद्द झाला होता. मात्र, भारतीय संघ मालिकेत २-१ फरकाने आघाडीवर असल्याने त्यांनी ही मालिकाही जिंकली. या मालिकेत पहिला सामनाही पावसामुळे रद्द झाला होता.

पाचवा सामना रद्द झाल्यानंतर भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला की, दुसऱ्या सामन्यात पराभूत झाल्यामुळे आम्ही ०-१ असे पिछाडीवर पडलो होतो, त्यानंतर ऑस्ट्रेलियात मालिका जिंकणे गौरवास्पद आहे. तसेच, यशाचे खरे श्रेय हे गोलंदाजांचे आहे. बुमरा आणि अर्शदीप आणि त्यानंतर फिरकी गोलंदाजांनी शानदार कामगिरी केली, त्यामुळे दोन सामने जिंकता आले. तयार केलेल्या डावपेचांनुसार सर्वच गोलंदाजांनी मारा केला, असे सूर्यकुमार म्हणाला. आता काही महिन्यांत होणाऱ्या विश्वकरंडक स्पर्धेपूर्वी दोन-तीन मालिका खेळणार आहोत. त्यासाठी उत्तम तयारी करता येईल. ऑस्ट्रेलियातील हे यश आत्मविश्वास वाढवणारे आहे.

# मुंबईची दमदार सुरूवात

**| मुंबई | प्रतिनिधी |**

रणजी चषकाच्या चौथ्या फेरीत मुंबईने हिमाचल प्रदेशविरुद्ध दमदार सुरुवात केली. मुशीर खान आणि सिद्धेश लाड यांनी शतके ठोकत मुंबईचा डाव सावरला.

मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, मुंबईने आयुष म्हात्रेच्या रुपात पहिली विकेट गमावली. तो ९ धावांवर बाद झाला. त्यानंतर अजिंक्य रहाणेही २ धावांवर बाद झाला. तर, हिमांशु सिंगलाही शून्यावर बाद झाला. त्यानंतर एक बाजू सांभाळणाऱ्या सलामीवीर मुशीर खानला त्याचा मोठा भाऊ सर्फराज खानने साथ दिली. परंतु, सर्फराजही १६ धावांवर बाद झाला. त्यानंतर मुशीरल आणि सद्धेश लाड या दोघांनी डाव सावरत दीडशे धावांची भागीदारी केली. दरम्यान, मुशीरचे शतकही पूर्ण झाले. त्यामुळे हे त्याचे प्रथम श्रेणी क्रिकेटमधील चौथे शतक ठरले. परंतु, शतकानंतर ११२ धावांवर बाद झाला. त्यानंतर सिद्धेशनेही त्याचे शतक पूर्ण केले. पहिल्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा मुंबईच्या ८८ षटकात ५ बाद २८९ धावा झाल्या होत्या. सिद्धेश लाडने नाबाद १०० धावा केल्या आहेत, तर त्याच्यासोबत आकाश २६ धावा करून नाबाद खेळत आहे.

# भारतीय ग्रँडमास्टरचे आव्हान संपुष्टात

**| पणजी | प्रतिनिधी |**



जगज्जेता भारतीय ग्रँडमास्टर डी. गुकेश याचे फिडे विश्वकरंडक बुद्धिबळ स्पर्धेतील आव्हान तिसऱ्या फेरीत संपुष्टात आले. शनिवारी दुसऱ्या डावात त्याला फ्रेडरिक स्वेन याने पराभूत केले, त्यामुळे गुकेशला जागतिक अजिंक्यपदानंतर विश्वकरंडक जिंकणे शक्य झाले नाही.

यावेळी फ्रेडरिक याने तिसऱ्या फेरीतील पहिल्या डावात शुक्रवारी गुकेशला बरोबरीत रोखले होते. शनिवारी २१ वर्षीय जर्मन ग्रँडमास्टरने वेळेच्या बंधनातून बाहेर पडत विजयासाठी प्रयत्न करणाऱ्या गुकेशला कोंडीत पकडले. अखेर १९ वर्षीय जगज्जेत्यास माघार घेत पराभव मान्य करावा लागला. फ्रेडरिक याने १.५-०.५ गुणफरकाने पुढील फेरी गाठली. तसेच, ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद याने आगेकूच राखताना आर्मेनियन ग्रँडमास्टर रॉबर्ट होव्हान्निसियान याला हरविले. दुसऱ्या डावात प्रज्ञानंद विजयी ठरला. आर्मेनियन खेळाडूने ४२ चालीअंती पराभव मान्य केला. पी. हरिकृष्ण याने बेल्जियमचा ग्रँडमास्टर डॅनियल दार्धा याला नमविले. पहिला डाव जिंकणाऱ्या हरिकृष्ण याने दुसऱ्या डावात झटपट बरोबरीस पसंती दिली.

अर्जुन एरिगैसी याने स्पर्धेतील सलग तीन विजयानंतर बरोबरी साधत चौथी फेरी गाठली. तिसऱ्या फेरीतील पहिल्या डावात पूर्ण गुण प्राप्त केलेल्या अर्जुन याने दुसऱ्या डावात उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर शम्सीद्दीन वोखिदोव याच्याविरुद्ध बरोबरीस पसंती दिली. प्रणव यानेही पहिल्या डावातील विजयानंतर ग्रँडमास्टर टिटास स्ट्रेमाव्हिसियस याच्याविरुद्ध दुसऱ्या डावातील बरोबरीसह आगेकूच राखली. तिसऱ्या फेरीतील अन्य भारतीय खेळाडूंत दोन्ही डाव बरोबरीत राहिल्यामुळे विदित गुजराथी, कार्तिक व्यंकटरमण, एस. नारायणन यांना रविवारी टायब्रेक फेरीत खेळावे लागेल. दिप्तयान घोष याचे आव्हान संपुष्टात आले.

**मुंबई उपनगर कबड्डी असो.च्या मान्यता | जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा**

# चेंबूर क्रीडा केंद्राची सुवर्ण चढाई

**| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |**



मुंबई उपनगर कबड्डी असो.च्या मान्यतेने गजानन क्रीडा मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्ट्स अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार पराग आळवणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली पार्ले येथील प्ले ग्राऊंडवर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत भानवे अकादमी, एस.आई.इ.एस. अकादमी व सत्यम संघ यांची कुमारी तर कुमार गटात नवरत्न मंडळ यांनी पूर्व विभागात उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. मात्र, चेंबूर क्रीडा केंद्र संघाला मात्र उपांत्यपूर्व फेरी गाठताना 'सुवर्ण चढाई'पर्यंत लढत द्यावी लागली.

या स्पर्धेतील पूर्व विभागातील कुमार गटाच्या उप उपांत्यपूर्व फेरीत चेंबूरच्या चेंबूर क्रीडा केंद्र संघाने सुवर्ण चढाईत कांजूरच्या सत्यम संघाला ३४-३३ असे चकवित उपांत्यपूर्व फेरीत धडक दिली. चेंबूर क्रीडा केंद्राने पूर्वार्धातील ०४-२० अशा पिछाडीवरून पूर्ण डावात २७-२७ अशी बरोबरी साधली. ५-५ चढायांच्या डावात पुन्हा ६-६(३३-३३) अशी बरोबरी झाली. शेवटी सुवर्ण चढाईत चेंबूरकरांनी सत्यमच्या ऋग्वेद तोरसकरची पकड करीत संघाला उपांत्यपूर्व फेरी गाठून दिली. चिराग पाटील यतार्थ माने चेंबूर क्रीडा केंद्र कडून, तर ऋग्वेद तोरसकर, तेजस कुंभार सत्यम संघ कडून उत्कृष्ट खेळले. कुमार गटाच्या दुसऱ्या सामन्यात विक्रोळीच्या नवरत्न मंडळाने चुनाभट्टीच्या भानवे अकादमीला ४२-२६ असे पराभूत केले.

कुमारी गटात मात्र भानवे अकादमीने कुर्लाच्या विशाल स्पोर्टस्चा २३-१६ असा पराभव करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली. प्राजक्ता राजवाडे, अनुष्का कनोजिया यांच्या चढाई पकडीच्या हा विजय सोपा केला. पराभूत संघाकडून अनुष्का सिंग, नम्रता शिवगण बऱ्या खेळल्या. कांजूरच्या सत्यम सेवा संघाने चेंबूरच्या बालवीर मंडळावर ३२-२६ अशी मात केली. विश्रांतीला १७-१३ अशी आघाडी सत्यम संघाकडे होती. आरती पवार, दर्शना घाडीगांवकर यांच्या उत्कृष्ट खेळाला या विजयाचे श्रेय जाते. बालवीरच्या तृप्ती बंडवे, समीक्षा पाटील यांनी कडवी लढत दिली. कुर्ल्याच्या एस. आई. इ. एस. अकादमीने राऊडी स्पोर्टसब चा ४२-०९ असा धुव्वा उडविला. आस्था सिंग, निशा रमण यांच्या झंझावती खेळाने ही विजयाची किमया साधली. राऊडीची गौरी कारंडे चमकली.

## निवडक

### महाराष्ट्राची धुरा दिग्विजयच्या खांद्यावर



**पुणो :** रांची येथे सुरू झालेल्या बीसीसीआयच्या २३ वर्षांखालील गटाच्या एकदिवसीय राज्य करंडक एलिट 'अ' गटाच्या क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाचे नेतृत्व दिग्विजय पाटीलकडे सोपविण्यात आले आहे. या स्पर्धेतील रविवारी (दि.९) पार पडलेल्या सलामीच्या लढतीत महाराष्ट्राचा सामना चंडीगड संघाबरोबर, दुसरा सामना मंगळवारी (दि.११) बडोदा संघाबरोबर, तिसरा सामना गुरूवारी (दि.१३) उत्तराखंड संघाबरोबर, चौथा सामना शनिवारी (दि.१५) बिहार संघाबरोबर, पाचवा सामना सोमवारी (दि.१७) पंजाब संघाबरोबर, सहावा सामना बुधवारी (दि.१९) बंगाल संघाबरोबर तर सातवा व अखेरचा साखळी सामना शुक्रवारी (दि.२१) छत्तीसगड संघाबरोबर होणार आहे. तत्पूर्वी, महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे सचिव ॲड. कमलेश पिसाळ यांनी जाहीर केलेल्या संघात दिग्विजय पाटील (कर्णधार), नीरज जोशी, अनिरुद्ध साबळे, सागर पवार, साहिल औताडे, किरण चोरमले, हर्ष मोगावीरा, अजय बोरुडे, शुभम मैद, राजवर्धन हंगर्गेकर, वैभव दरकुंडे, प्रथमेश गावडे, श्रेयस चव्हाण, रोशन वाघसरे, अभिषेक पवार, यश बोरामणी आदींचा समावेश आहे.

### 'आशिया चषकाची कोंडी फोडण्यात यश'




**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांतील क्रिकेट मंडळांना आशिया चषकासंदर्भात निर्माण झालेली कोंडी फोडण्यात यश आले आहे. यावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न सुरू आहेत, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले. दुबईतील आयसीसीच्या बैठकीदरम्यान पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्याशी झालेल्या भेटीनंतर सैकिया माध्यमांशी बोलत होते. भारतीय संघाने पाकिस्तानचा पराभव करून आशिया करंडक स्पर्धेत विजेतेपद मळिवले होते; परंतु, आशिया क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष असलेल्या नक्वी यांच्या हस्ते करंडक स्वीकारण्यास नकार दिला होता. नक्वी हे पाकिस्तानचे गृहमंत्रीही असल्यामुळे त्यांच्या भारताविरोधी भूमिकेमुळे भारतीय संघाने हे पाऊल उचलले होते.

### स्नेह राणाचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

**देहरादून :** उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी महिला विश्वचषकात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या उत्तराखंडच्या स्नेह राणाला ५० लाख रुपये देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. मुख्यमंत्री धामी यांनी स्नेह राणाशी फोनवर संवाद साधून



विश्वचषकातील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आणि भारतीय महिला क्रिकेट संघाला विजय मळिवून दिल्याबद्दल तिचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले की, स्नेह राणा यांनी आपल्या मेहनत, संकल्प आणि प्रतिभेने उत्तराखंडचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले आहे. त्यांचे यश आमच्या युवकांसाठी, विशेषतः मुलींसाठी, एक मोठी प्रेरणा आहे. तसेच, राज्यातील खेळाडूंना सर्वोत्तम सुविधा आणि प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

### रिचा घोष 'बंगभूषण' पुरस्काराने सन्मानित



**नवी दिल्ली :** भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून इतिहास घडवला आहे. त्यानंतर या विश्वविजयी भारतीय संघावर केवळ कौतुकांचाच नव्हे तर बक्षीसांचाही वर्षाव सुरू आहे. या संघातील खेळाडूंना आता त्यांच्या राज्यांकडून विविध पुरस्कारांनी सन्मानित केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर आता भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज अनब विकेटकीपर रिचा घोष हिला पश्चिम बंगाल पोलिसात उप-पोलीस अधीक्षक (डीएसपी) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालच्या सत्कार समारंभात तिला स्वतः नियुक्ती पत्र दिले. विश्वचषक विजयात रिचाने महत्त्वाची भूमिका बजावली होती.याशिवाय, पश्चिम बंगाल सरकारकडून रिचा घोषला 'बंगभूषण' पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आलं आहे. तसेच, बंगाल सरकारने तिला सोन्याची साखळी देखील प्रदान केली आहे. याशिवाय क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालने तिला सोन्याची बॅट आणि सोन्याचा चेंडू प्रदान केला आहे.

### क्रांतीच्या वडिलांवरील बंदी उठणार

**नवी दिल्ली :** भारतीय महिला संघाने एकदिवसीय विश्व चषक जिंकून इतिहास रचला. त्यामुळे क्रांती गौडच्या विश्व चषकातील कामगिरीमुळे तिच्या वडिलांची बंदी उठवण्याचे आश्वासन मुख्यमंत्री मोहन यादव यांनी दिले. तसेच, क्रांतीच्या यशामुळे तिच्या कुटुंबाला आर्थिक अडचणींवर मात करण्याची संधी मिळाली आहे. क्रांतीचे कुटुंब मुळचे मध्य प्रदेशमधील बुंदेलखंड प्रदेशातील चंद्रपूर जिल्ह्यातील घुवारा गावचे आहे. ती विश्व चषक जिंकून घरी आल्यानंतर भोपाळमध्ये तिचे मध्य प्रदेशचे मुख्य मंत्री मोहन यादव यांनी एका कार्यक्रमात तिचा गौरव केला. यावेळी तिचे वडील मुन्ना सिंह गौड, निलम सिंह गौड व प्रशिक्षक राजीव बिथारे उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री यादव यांनी, क्रांतीच्या वडिलांवर लागलेली बंदी उठवून त्यांना पुन्हा पदावर नियुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)